
Government of Karnataka

# माय मराठी

## Marathi First Language
## Text Cum Work Book




**Karnataka Text Book Society®**
100 Ft. Ring Road, Banashankari, III stage,
Bangalore-85

© KTBS Not to be republished

# Preface

The Textbook Society, Karnataka has been engaged in producing new textbooks according to the new syllabi which in turn are designed on NCF – 2005 since June 2010. Textbooks are prepared in 12 languages; seven of them serve as the media of instruction. From standard 1 to 4 there is the EVS, mathematics and 5th to 10th there are three core subjects namely mathematics, science and social science.

NCF – 2005 has a number of special features and they are:

- connecting knowledge to life activities
- learning to shift from rote methods
- enriching the curriculum beyond textbooks
- learning experiences for the construction of knowledge
- making examinations flexible and integrating them with classroom experiences
- caring concerns within the democratic policy of the country
- making education relevant to the present and future needs.
- softening the subject boundaries- integrated knowledge and the joy of learning.
- the child is the constructor of knowledge

The new books are produced based on three fundamental approaches namely.

Constructive approach, Spiral Approach and Integrated approach. The learner is encouraged to think, engage in activities, master skills and competencies. The materials presented in these books are integrated with values. The new books are not examination oriented in their nature. On the other hand they help the learner in the all round development of his/her personality, thus help him/her become a healthy member of a healthy society and a productive citizen of this great country, India.

The most important objectives of teaching language are listening, speaking, reading, writing and reference work. These skills have been given a lot of importance in all the language textbooks. Along with the inculcation of these skills, fundamental grammar, opportunities for learners to appreciate beauty and imbibe universal life values have been integrated in language textbooks. When learners master these competencies, they would stop studying textbooks for the sake of passing examinations. In order to help learners master these competencies, a number of paired and group activities, assignments and project work have been included in the textbooks. It is expected that these activities would help learner master communicative skills. Ultimately, it is expected that students master the art of learning to learn and make use of these competencies in real life.

The Textbook Society expresses grateful thanks to the chairpersons, writers, scrutinisers, artists, staff of DIETs and CTEs and the members of the Editorial Board and printers in helping the Text Book Society in producing these textbooks. A few works of some writers and poets have been included in these textbooks. The textbook society is extremely grateful to them for giving their consent for the inclusion of these pieces in the textbooks.

**Prof G S Mudambadithaya**
Coordinator
Curriculum Revision and Textbook Preparation
Karnataka Textbook Society®
Bengaluru, Karnataka

**Nagendra Kumar**
Managing Director
Karnataka Textbook Society®
Bengaluru, Karnataka

©KTBS Not to be republished

# हितगुज

मित्रहो,

भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये अत्याधुनिकता आणण्यासाठी आणि शिक्षण अधिकाधिक विद्यार्थीकेंद्रित करण्यासाठी नवनवीन पद्धतींचा अवलंब केला जात आहे. पंचवार्षिक योजनांप्रमाणे विशिष्ट टप्प्यावर शैक्षणिक सुधारणांचे पुनरावलोकन करून वेळोवेळी विधायक बदलही केले जात आहेत. अर्थात शैक्षणिक सुधारणा करताना अलिकडच्या पंचवीस वर्षात 'समान राष्ट्रीय शैक्षणिक कार्यक्रम' राबविण्यात आला याची भारतवासीयांनी आवर्जून दखल घ्यायला हवी असे सांगावेसे वाटते.

सन 1986 मध्ये 'नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' स्वीकारून शिक्षण पद्धतीत राष्ट्रीय समानतेचा पाया घातला गेला. 1998 पासून संपूर्ण देशभर 'सामर्थ्याधारित शिक्षण' या सुधारित योजनेचा प्रारंभ झाला आणि सर्व विद्यार्थ्यांना किमान सामर्थ्ये प्राप्त करून देण्याची जबाबदारी एक राष्ट्रीय कर्तव्य म्हणून शिक्षक बंधू भगिनींनी स्वीकारली आहे असे दिसून येते आहे.

बदलत्या काळाप्रमाणे आपण स्वतःच्या राहणीमान, आचार विचारात बदल करत असतो. शिक्षणक्षेत्र त्याला अपवाद नाही. अत्याधुनिकता आत्मसात करणे, नवे विचार घेऊन पुढे जाणे. हा तर 'विद्या सरितेचा' स्थायीभाव आहे. बदल म्हणण्यापेक्षा समाजाभिमुख असलेले समाजोपयोगी 'नवविचार' ही काळाची गरज असते. राष्ट्रीय पातळीवर या नवविचाराचे मंथन निरंतर होत असते. या विचारमंथनातून तयार होणारे 'नवनीत' बालविकासाला पुष्टिकर असेल अशी आशा मनी बाळगून 2005 मध्ये 'अभ्यासक्रमाची राष्ट्रीय चौकट' तयार करण्यात आली. एन.सी.इ.आर.टी मध्ये तयार झालेल्या या राष्ट्रीय विचाराला 'एन.सी.एफ्-2005' असे संबोधिण्यात आले आहे. एन.सी.एफ-2005 बाबत विस्ताराने शिक्षक मार्गदर्शिकेत माहिती दिलेली आहेच. तथापी या ' करिक्युलम फ्रेम वर्क 2005' प्रमाणे तयार केलेले प्रस्तुत पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना 'राष्ट्रीय विचारांचे बीजारोपण' करीत आहे

सत्य आणि अहिंसेचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देणाऱ्या भगवान गौतम बुद्धांच्या या देशात महात्मा गांधीजीनी हा संदेश सर्वदूर पोहचविला. आचार्य विनोबा भावे, साने गुरुजी या सारख्या गांधीवादी नेत्यांनी सत्य अहिंसेच्या विचारांची जोपासना केली.

सत्य अहिंसेच्या तत्त्वांवर दृढ विश्वास असणाऱ्या महात्मा गांधीजीनाही मानवी हक्कांसाठी 'छोडो भारत' सारखी चळवळ उभारून 'चलेजाव' चा नारा द्यावा लागला. स्वातंत्र्यासाठी 'करो या मरो' ही घोषणा द्यावी लागली. म्हणजेच कणखर व्हावे लागले हे ऐतिहासिक सत्य विसरून चालणार नाही.

'एन.सी.एफ' . 2005' मधून विचाराने, आचाराने कणखर आणि प्रतिभावान भारताच्या उभारणीचे बीजारोपण केले आहे.

शिक्षणाच्या या नवविचारातून प्रेरणा घेऊन भाषा, गणित, विज्ञान आणि विशेषतः समाजविज्ञान या सर्वच विषयातून एक प्रगल्भ राष्ट्रीय चेतना देण्याचे ध्येय 'भारतीय शिक्षणाने' उराशी बाळगले आहे. या राष्ट्रीय ध्येयाचा उद्देश 'बलसागर भारत होवो। विश्वात शोभुनी राहो' या पूज्य साने गुरुजींच्या शब्दात सांगून पाठ्यपुस्तक मंडळ आपले 'हितगुज' पूर्ण करीत आहे.

या राष्ट्रीय ध्येयाप्रत घेऊन जाण्यासाठी प्रस्तुत पाठ्यपुस्तक केवळ एक माध्यम आहे. वैचारिक बीजारोपणाचे ते एक साधन आहे. या साधनात सुधारणा करण्यासाठी सर्व शिक्षणप्रेमीनागरीक, शिक्षक बंधू-भगिनी व पालक बंधू भगिनींच्या विधायक सूचनांचे पाठ्यपुस्तक निर्देशनालयात स्वागत आहे. निर्देशनालयाच्या आदेशाप्रमाणे पुस्तक रचना समितीची यादी इंग्रजीमध्ये दिलेली आहे.

प्रस्तुत पाठ्यपुस्तकाच्या निर्मितीमध्ये श्रीमती उषाताई गोगटे गर्ल्स हायस्कूल बेळगावीचे मुख्याध्यापक श्री. एम्.के. मादार यांनी कार्यशाळांकरिता सभागृह आणि ग्रंथालय उपलब्ध करून दिले.

'बाल भारती' पुणे येथील मराठी विषयाचे विशेष अधिकारी प्रा. माधव राजगुरु यानी पाठ्यपुस्तक निर्मितीच्या कार्यात वेळोवेळी अमूल्य सल्ला दिला. लेखक व कवी यांची अनुमती मिळवून देण्याबाबत सहकार्य केले.

पाठ्यपुस्तक मंडळ या सर्वांचे अत्यंत आभारी आहे.

**पाठ्यपुस्तक मंडळ**

©KTBS Not to be republished

# TEXT BOOK COMMITTEE

## CHAIRPERSON

**Shri. Madhav Kunte** Ushatai Gogte Girls' High School, Belagavi.

## MEMBERS

**Shri. P.K. Muchandikar,** C.R.P.-Belgundi, Tal. & Dist. : Belagavi.

**Shri. A.V. Desai,** Rtd. H.M. Yellur, Tal. & Dist. : Belagavi.

**Smt. N.K.Shaikh,** C.R.P.-Kadoli, Tal. & Dist. : Belagavi.

**Smt. Suman Shrikhande,** Govt. Hr. Pry. Marati School No. 19, Alawan Galli, Shahapur-Belagavi.

## ARTIST

**Shri. V.B. Shinge,** Art Master, Karnataka High school, Dharwad.

## SCRUTINIZER

**Shri. L.R. Masekar,** Rtd, Head Master, Bachi, Tal. & Dist. : Belagavi.

## CHIEF CO-ORDINATOR

**Prof. G.S. Mudambadithaya,** Curruculum revision and text book preparation K.T.B.S Bengaluru.

## CHIEF ADVISERS

**Shri. Narasimaiah,** Managing Director, KTBS, Bengaluru.

**Sri. Nagamani,** Deputy Director, KTBS, Bengaluru.

## PROGRAMME CO-ORDINATOR

Smt.Chandrakala, Assistant Director, KTBS Bengaluru.

©KTBS Not to be republished

# ಪರಿಷ್ಕರಣೆ ಕುರಿತು

ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಬಗ್ಗೆ ಪ್ರಕಟಗೊಂಡ ಸಾರ್ವಜನಿಕ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಗಮನಿಸಿ ಮಾನ್ಯ ಮುಖ್ಯಮಂತ್ರಿಯವರೂ ಅರ್ಥಸಚಿವರೂ ಆಗಿರುವ ಶ್ರೀ ಸಿದ್ದರಾಮಯ್ಯನವರು ತಮ್ಮ 2014–15 ರ ಬಜೆಟ್‌ನಲ್ಲಿ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ರಚಿಸುವ ಘೋಷಣೆ ಮಾಡಿದರು. ತಜ್ಞರು ಅನುಸರಿಸಬೇಕಾದ ಮೂಲ ಆಶಯವನ್ನು ಹೀಗೆ ಹೇಳಿದರು: "ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯ, ನೈತಿಕಮೌಲ್ಯಗಳು, ವ್ಯಕ್ತಿತ್ವವಿಕಸನ, ವೈಜ್ಞಾನಿಕ ಮತ್ತು ವೈಚಾರಿಕ ಮನೋಭಾವ, ಜಾತ್ಯತೀತತೆ ಮತ್ತು ರಾಷ್ಟ್ರಿಯ ಬದ್ಧತೆಗಳಿಗೆ ಅನುವಾಗುವಂತೆ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ಪುನರ್ ರಚಿಸಲಾಗುವುದು" – ಇದು ಬಜೆಟ್ ಭಾಷಣದಲ್ಲಿ ಸಾದರಪಡಿಸಿದ ಆಶಯ.

ಆನಂತರ ಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆಯು ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯವರೆಗಿನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಪರಿಷ್ಕರಣೆಗಾಗಿ 27 ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ದಿನಾಂಕ: 24.11.2014 ರಂದು ಆದೇಶ ಹೊರಡಿಸಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ವಿಷಯವಾರು ಮತ್ತು ತರಗತಿವಾರು ಮಾನದಂಡಕ್ಕನುಗುಣವಾಗಿ ರಚಿತವಾದವು. ವಿವಿಧ ಪಠ್ಯವಿಷಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರು, ಅಧ್ಯಾಪಕರು ಈ ಸಮಿತಿಗಳಲ್ಲಿದ್ದಾರೆ. ಈಗಾಗಲೇ ಲಿಖಿತವಾಗಿ ಬಂದಿರುವ ಅನೇಕ ಆಕ್ಷೇಪಗಳು ಮತ್ತು ವಿಶ್ಲೇಷಣೆಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಿ, ತಪ್ಪು ಒಪ್ಪುಗಳ ಬಗ್ಗೆ ನಿರ್ಣಯಿಸಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ ಹೊಣೆಹೊತ್ತ ಈ ಸಮಿತಿಗಳಿಗೆ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪಠ್ಯವಸ್ತುವನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸಿ ನಂತರ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು 24.11.2014ರ ಆದೇಶದಲ್ಲೇ ನೀಡಲಾಗಿತ್ತು. ಆನಂತರ 19.09.2015 ರಂದು ಹೊಸ ಆದೇಶ ಹೊರಡಿಸಿ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪುನರ್ ರಚಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು ನೀಡಲಾಯಿತು. ಹೀಗೆ ಸಮಗ್ರ ಪರಿಷ್ಕರಣೆಗೊಂಡ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು 2016–17 ರ ಬದಲು 2017–18ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಜಾರಿಗೊಳಿಸಲಾಗುವುದೆಂದು ಇದೇ ಆದೇಶದಲ್ಲಿ ತಿಳಿಸಲಾಯಿತು.

ಅನೇಕ ವ್ಯಕ್ತಿಗಳೂ ಸಂಘಟನೆಗಳೂ ಸ್ವಯಂಪ್ರೇರಿತರಾಗಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಮಾಹಿತಿದೋಷ, ಆಶಯದೋಷಗಳನ್ನು ಪಟ್ಟಿಮಾಡಿ ಶಿಕ್ಷಣ ಸಚಿವರಿಗೆ, ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘಕ್ಕೆ ಕಳುಹಿಸಿದ್ದರು. ಅವುಗಳ ಪರಿಶೀಲನೆಮಾಡಿದ್ದಲ್ಲದೆ, ಸಮಿತಿಗಳಾಚೆಗೆ ಅನೇಕ ಸಂವಾದಗಳನ್ನು ಏರ್ಪಡಿಸಿ ವಿಚಾರ ವಿನಿಮಯ ಮಾಡಿಕೊಂಡಿದ್ದೇವೆ. ಪ್ರಾಥಮಿಕ ಮತ್ತು ಪ್ರೌಢಶಾಲಾ ಅಧ್ಯಾಪಕರ ಸಂಘಗಳ ಜೊತೆ ಚರ್ಚಿಸಿದ್ದಲ್ಲದೆ ಪ್ರಶ್ನಾವಳಿ ಸಿದ್ಧಪಡಿಸಿ ಅಧ್ಯಾಪಕರಿಗೆ ಕಳಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಸಂಗ್ರಹಿಸಲಾಗಿದೆ. ಅಧ್ಯಾಪಕರು, ವಿಷಯಪರಿವೀಕ್ಷಕರು ಮತ್ತು ಡಯಟ್ ಪ್ರಾಂಶುಪಾಲರ ಪ್ರತ್ಯೇಕ ಸಭೆಗಳನ್ನು ನಡೆಸಿ ವಿಶ್ಲೇಷಣಾತ್ಮಕ ಅಭಿಮತಗಳನ್ನು ಪಡೆಯಲಾಗಿದೆ. ವಿಜ್ಞಾನ, ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ, ಭಾಷೆ ಸಾಹಿತ್ಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರಿಗೆ ಮೊದಲೇ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಕಳುಹಿಸಿ ಆನಂತರ ಸಭೆ ನಡೆಸಿ ಚರ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಮಹಿಳಾ ಸಂಘಟನೆ ಹಾಗೂ ವಿಜ್ಞಾನ ಸಂಬಂಧಿ ಸಂಸ್ಥೆಗಳನ್ನು ಆಹ್ವಾನಿಸಿ ಚಿಂತನೆ ನಡೆಸಲಾಗಿದೆ. ಹೀಗೆ ಎಲ್ಲಾ ಮೂಲಗಳಿಂದ ಪಡೆದ ಅರಿವಿನ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಅಗತ್ಯವಿದ್ದಕಡೆ ಪರಿಷ್ಕರಿಸಲಾಗಿದೆ.

©KTBS Not to be republished

ಬಹುಮುಖ್ಯವಾದ ಇನ್ನೊಂದು ಸಂಗತಿಯನ್ನು ಇಲ್ಲಿ ಹೇಳಬೇಕು. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ (N.C.E.R.T) ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ತೌಲನಿಕವಾಗಿ ಅಧ್ಯಯನ ಮಾಡಿ ಸಲಹೆಗಳನ್ನು ನೀಡಲು ವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ ಮತ್ತು ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನಕ್ಕೆ ಸಂಬಂಧಿಸಿದಂತೆ ತಜ್ಞರ ಮೂರು ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಲಾಯಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ನೀಡಿದ ತೌಲನಿಕ ವಿಶ್ಲೇಷಣೆ ಮತ್ತು ಸಲಹೆಗಳನ್ನು ಆಧರಿಸಿ ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟವನ್ನು ಹೆಚ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳಿಗಿಂತ ನಮ್ಮ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟ ಕಡಿಮೆಯಾಗದಂತೆ ಕಾಯ್ದುಕೊಳ್ಳಲಾಗಿದೆ. ಜೊತೆಗೆ ಆಂಧ್ರ, ತಮಿಳುನಾಡು, ಮಹಾರಾಷ್ಟ್ರಗಳ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ನಮ್ಮ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಲಾಗಿದೆ.

ಇನ್ನೊಂದು ಸ್ಪಷ್ಟನೆಯನ್ನು ನೀಡಲು ಬಯಸುತ್ತೇನೆ. ನಮ್ಮ ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿರುವುದು ಪರಿಷ್ಕರಣೆಯೇ ಹೊರತು ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸಮಗ್ರ ರಚನೆಯಲ್ಲ. ಆದ್ದರಿಂದ ಈಗಾಗಲೇ ರಚಿತವಾಗಿರುವ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸ್ವರೂಪಕ್ಕೆ ಎಲ್ಲಿಯೂ ಧಕ್ಕೆಯುಂಟುಮಾಡಿಲ್ಲ. ಲಿಂಗತ್ವ ಸಮಾನತೆ, ಪ್ರಾದೇಶಿಕ ಪ್ರಾತಿನಿಧ್ಯ, ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಸಮಗ್ರತೆ, ಸಮಾನತೆ, ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯಗಳ ಹಿನ್ನೆಲೆಯಲ್ಲಿ ಕೆಲವು ಪರಿಷ್ಕರಣೆಗಳು ನಡೆದಿವೆ. ಹೀಗೆ ಪರಿಷ್ಕರಿಸುವಾಗ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟು ಮತ್ತು ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟುಗಳನ್ನು ಮೀರಿಲ್ಲವೆಂದು ತಿಳಿಸಬಯಸುತ್ತೇನೆ: ಜೊತೆಗೆ ನಮ್ಮ ಸಂವಿಧಾನದ ಆಶಯಗಳನ್ನು ಅನುಸರಿಸಲಾಗಿದೆ. ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿದ ಪರಿಷ್ಕರಣೆಯನ್ನು ಮತ್ತೊಮ್ಮೆ ಪರಿಶೀಲಿಸಲು ವಿಷಯವಾರು ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಪಡೆದು ಅಳವಡಿಸಲಾಗಿದೆ.

ಹೀಗೆ ಕ್ರಮಬದ್ಧವಾಗಿ ನಡೆದ ಕೆಲಸಕ್ಕೆ ತಮ್ಮನ್ನು ತಾವು ಸಂಪೂರ್ಣ ತೊಡಗಿಸಿಕೊಂಡ 27 ಸಮಿತಿಗಳ ಅಧ್ಯಕ್ಷರು ಮತ್ತು ಸದಸ್ಯರನ್ನು ಹಾಗೂ ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನಾ ಸಮಿತಿಯ ಸಮಸ್ತರನ್ನು ಕೃತಜ್ಞತೆಯಿಂದ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಅಂತೆಯೇ ಸಮಿತಿಗಳ ಕೆಲಸ ಸುಗಮವಾಗಿ ನಡೆಯುವಂತೆ ವ್ಯವಸ್ಥೆಮಾಡಲು ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಅಧಿಕಾರಿಗಳಾಗಿ ನಿಷ್ಠೆಯಿಂದ ದುಡಿದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘದ ಎಲ್ಲಾ ಅಧಿಕಾರಿಗಳನ್ನೂ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಸಹಕರಿಸಿದ ಸಿಬ್ಬಂದಿಗೂ ನಮ್ಮ ವಂದನೆಗಳು. ಅಭಿಪ್ರಾಯ ನೀಡಿ ಸಹಕರಿಸಿದ ಸರ್ವ ಸಂಘಟನೆಗಳು ಮತ್ತು ತಜ್ಞರಿಗೆ ಧನ್ಯವಾದಗಳು.

**(ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ)**
ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು
ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ)
ಬೆಂಗಳೂರು-85

**(ಹೆಚ್.ಎನ್.ಗೋಪಾಲಕೃಷ್ಣ)**
ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ)
ಬೆಂಗಳೂರು-85

©KTBS Not to be republished

# ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿಗಳ ವಿವರ

**ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು**

**ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ** : ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು.

## ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ

**ಅಧ್ಯಕ್ಷರು**

**ಶ್ರೀಮತಿ ಎಸ್.ವಿ. ದೇಶಪಾಂಡೆ** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಆರ್.ಪಿ.ಡಿ ಕಾಲೇಜ್, ಬೆಳಗಾವಿ.

**ಸದಸ್ಯರು**

**ಶ್ರೀಮತಿ ಕಿಶೋರಿ ಡಿ. ಜೋಷಿ** : ನಿವೃತ್ತ ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಮರಾಠಿ ವಿಭಾಗ, G I ಬಾಗೇವಾಡಿ ಕಾಲೇಜು, ನಿಪ್ಪಾಣಿ.

**ಪ್ರೊ.ಎಸ್.ಎಸ್. ಚೌಹಾನ್** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು ಮರಾಠಿ ವಿಭಾಗ, ಮರಾಠಿ ಮಂಡಲ ಕಾಲೇಜು, ಬೆಳಗಾವಿ.

**ಶ್ರೀಮತಿ ಅಲಕಾ ಮುತ್ಕೇಕರ್** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಮರಾಠ ಮಂಡಳ ಕಾಲೇಜು

**ಡಾ.ಎಸ್.ಎಂ ರಾಯಮಾನೆ** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಕೆ.ಎಲ್.ಇ, ಬಿ.ಕೆ ಕಾಲೇಜು, ಚಿಕ್ಕೋಡಿ.

**ಶ್ರೀ.ಪ್ರಕಾಶ್ ಬಿ.ನಾಗರ್ಲೆ** : ನಿವೃತ್ತ ಶಿಕ್ಷಕರು, ಮುನಿಸಿಪಲ್ ಪ್ರೌಢಶಾಲೆ, ನಿಪ್ಪಾಣಿ, ಚಿಕ್ಕೋಡಿ ತಾ. ಬೆಳಗಾವಿ ಜಿಲ್ಲೆ.

## ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿ

**ಶ್ರೀ ಸರಜು ಕಾಟ್ಕರ್** : ಮಹಾಂತೇಶ್ ನಗರ, ಬೆಳಗಾವಿ.

**ಶ್ರೀ ರಾಮಕೃಷ್ಣ ಮಾರುತಿ ಮರಾಠೆ** : ಶ್ರೀಕಲ್ಪ, ಶಾಂತಿ ನಿಕೇತನ, ಟೀಚರ್ಸ್ ಕಾಲೋನಿ, ಬೆಳಗಾವಿ.

**ಡಾ. ಗೋಪಾಲ್.ಎಸ್.ಮಹಾಮುನಿ ಅಲಿಯಾಸ್ ಸುತಾರ್** : ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಶಾಂತಿನಗರ, ಚಿಕ್ಕೋಡಿ ತಾ. ಬೆಳಗಾವಿ ಜಿಲ್ಲೆ.

**ಸಲಹೆ ಮತ್ತು ಮಾರ್ಗದರ್ಶನ**

**ಶ್ರೀ ಹೆಚ್.ಎನ್. ಗೋಪಾಲಕೃಷ್ಣ** : ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ), ಬನಶಂಕರಿ 3ನೇಹಂತ ಬೆಂಗಳೂರು-85.

**ಶ್ರೀ ಎಸ್.ಜಿ. ನಾಗೇಶ್** : ಉಪನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬನಶಂಕರಿ 3ನೇ ಹಂತ ಬೆಂಗಳೂರು-85.

**ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಸಂಯೋಜಕರು**

**ಶ್ರೀಮತಿ ಆಶಾರಾಣಿ. ಎನ್.** : ಸಹಾಯಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬನಶಂಕರಿ 3ನೇ ಹಂತ ಬೆಂಗಳೂರು-85.

©KTBS Not to be republished



इयत्ता – दुसरी


## अनुक्रमणिका


| अ. क्र | पाठाचे नांव | | लेखक/कवी | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| 1. | प्रार्थना | (कविता) | श्री. ग.ह. पाटील | 1 |
| 2. | वृक्षप्रेम | | | 4 |
| 3. | बाहुलीची शाळा | (कविता) | प्रचलित गीत | 9 |
| 4. | ससलू वाट चुकला | | | 13 |
| 5. | गौरव | | | 18 |
| 6. | आपला राष्ट्रध्वज | (कविता) | संकलित | 26 |
| 7. | आणि मिनी सुधारली | | | 28 |
| 8. | आकाशातल्या चंद्रा | (कविता) | संकलित | 33 |
| 9. | मित्र धर्म | | | 36 |
| 10. | त्याचे होईल कल्याण | (कविता) | संकलित | 42 |
| 11. | जिद्द | | | 46 |
| 12. | कोकणचा राजा | (कविता) | संकलित | 52 |
| 13. | परोपकारी गरुड | | | 55 |
| 14. | गाडी आली गाडी आली | (कविता) | प्रचलित गीत | 60 |
| 15. | गोड सारंगी | | | 63 |
| 16. | चला चला रे | (कविता) | श्री. गोविंद केळकर | 68 |
| 17. | निरोगी शरीर | | | 71 |
| 18. | आणखी कोण | (कविता) | प्रचलित कोडी | 77 |
| 19. | खेळ खेळूया लंगडीचा | | | 80 |


©KTBS Not to be republished

पाठ - १

# प्रार्थना



अजाण आम्ही तुझी लेकरे तू सर्वांचा पिता,
प्रेमाने तुज नमितो गातो तुझ्या गुणांच्या कथा ।।धृ।।

चंद्रसूर्य हे तुझेच देवा तुझी गुरे, वासरे.
तुझीच शेते, सागर, डोंगर, फुले, फळे, पाखरे ।।१।।

अनेक नावे तुला तुझी रे दाही दिशांना घर
करिशी देवा सारखीच तू माया सगळ्यांवर ।।२।।

खूप शिकावे काम करावे प्रेम धरावे मनी
हौस एवढी पुरवी देवा हीच एक मागणी ।।३।।

- श्री. ग.ह. पाटील

©KTBS Not to be republished

## नवीन शब्दांचे अर्थ –

अजाण – समज नसलेला

लेकरे – मुले

नमितो – नमन करतो

हौस – आवड

माया – प्रेम

## अभ्यास

### अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. आम्ही कोणाची लेकरे आहोत?

२. देवाचे घर कोठे आहे?

३. देव सगळ्यांवर कशी माया करतो?

४. देवाची कोण कोण लेकरे आहेत?

५. लेकरांनी देवाकडे कोणती मागणी केली आहे?

६. सर्वांचा पिता कोण?

### आ. कवितेतील ओळीवरुन उदाहरणाप्रमाणे शब्द लिही.

उदा. खूप शिकावे

काम ...............

प्रेम ...............

### इ. शिक्षकांच्या सहाय्याने दहा दिशांची नावे लिही.

________________ ________________ ________________

________________ ________________ ________________

________________ ________________

________________ ________________

Not to be republished ©KTBS

**ई. चित्रासमोर कंसात दिलेले शब्द शोधून लिही.**

(समुद्र, सुमन, शशी, देव, रवी,)

**उ. खालील नमुन्याप्रमाणे कवितेतील नादमधुर शब्द शोधून लिही.**

नमुना :- घर, वर

**ऊ. खालील नमुन्याप्रमाणे जोडशब्द तयार कर.**

नमुना :- गुरे - वासरे

१. फूले ..............  ५. ............... धंदा

२. ................ दार  ६. हसत ...............

३. पाला ..............  ७. मीठ ................

४. लपत ..............  ८. ............... सोड

**ए. कंसातील योग्य अक्षर रिकाम्या जागी वापरुन शब्द बनवा. आता तो शब्द उलट सुलट कसाही वाचा, त्या शब्दांचा अर्थ दिला आहे.**

स - स = (क, च, म) पौष्टिक आहार

न - न = (स, म, ल) नमस्कार

म - म = (श, ल, क) जखमेवर लावण्याचे औषध

क - क = (चि, णि, वि) गव्हाचे पीठ

©KTBS Not to be republished

पाठ – २

# वृक्षप्रेम

जग्गूच्या वडिलांना निसर्गाचे फार वेड होते. तासन्तास ते आपल्या बागेच्या देखभाली करिता वेळ घालवत. गावात त्यांची बाग 'आदर्श बाग' म्हणून प्रसिद्ध होती.

एकदा संध्याकाळी जग्गू व त्याचे मित्र बागेत फिरत होते. तेव्हाच जग्गूच्या वडिलांनी बागेत कुठल्याही झाडाला हात लावायचा नाही, असे बजावून ठेवले होते. पण खेळण्याच्या ओघात मुलांनी झाडाच्या फांद्या तोडल्या व त्यांच्या छड्या करुन ती खेळू लागली. त्यांनी १० - १२ रोपांचा नाश केला.



जग्गूचे वडिल थोड्या वेळाने बागेत आले. रोपांची दुर्दशा पाहून त्यांना वाईट वाटले. जग्गूला त्यांनी बोलावून घेतले व म्हणाले 'जग्गू रोपांचा नाश कोणी केला?'

© KTBS Not to be republished



जग्गूला आपली चूक कळून आली. त्याचे डोळे भरुन आले. तो म्हणाला बाबा! मला क्षमा करा. त्याने आपली चूक कबूल केली. हे पाहून वडिलांचा राग शांत झाला. ते म्हणाले, हे बघ जग्गू, झाडांनाही जीव असतो. त्यांना फुलविण्यातच आयुष्याचे सार्थक असते.

वडिलांचे शब्द जग्गूच्या कानात सारखे घुमत होते. जग्गूने विचार केला, मी सुद्धा एक फुलाचे रोप लावीन. त्याने मनाशी निश्चय केला. जग्गू मित्राबरोबर त्याच्या घरी गेला. त्याच्या परसातील जास्वंदीच्या झाडाची फांदी घरी आणली. आपल्या बागेत एक खड्डा खणला. पालापाचोळा खड्डयात घातला. फांदी लावली. दररोज जग्गू त्याला पाणी घालू लागला. त्या रोपाची तो देखभाल करण्यात मग्न झाला. रोपाला कोंब फुटले. पालवी आली. तसतसा जग्गूचा आनंद वाढत गेला. कष्ट केलेले त्याला जाणवेनासे झाले आणि एक दिवस त्या रोपट्याचे झाडात रूपांतर झाले. झाडाला कळ्या आल्या. सुंदर जास्वंदीचे फूल ऐटीत डोलू लागले. त्या दिवशी जग्गू वडिलांना घेऊन बागेत गेला. त्याने स्वतः वाढविलेले झाड दाखविले. वडिलांना आनंद झाला. वडिलांनी जग्गूला

©KTBS Not to be republished

शाबासकी दिली व म्हणाले, बाळ असाच झाडावर प्रेम करण्यास शिक. जीवन आनंददायी कर. आपल्या आनंदी जीवनाचा मंत्र लक्षात ठेव –

**“झाडे लावा, झाडे जगवा!”**

**नवीन शब्दांचे अर्थ –**

देखभाल करणे – काळजी घेणे

खेळण्याच्या ओघात – खेळण्याच्या नादात

सार्थक – सफलता

दुर्दशा – वाईट स्थिती

पालवी – नवीन पाने

## अभ्यास

**अ. खालील शब्द मोठ्याने वाच आणि समजून घे.**

निसर्ग, आदर्श, प्रसिद्ध, दुर्दशा, सार्थक, जास्वंदी, खड्डा, प्रेम.

**आ. खालील प्रश्नांची उत्तरे दे.**

१. जग्गूच्या वडिलांना कशाचे वेड होते?

२. वडिलांनी जग्गूला काय बजावले होते?

३. जग्गूने कोणता निश्चय केला?

४. त्याने जास्वंदीच्या झाडाची फांदी कशासाठी घरी आणली?

५. जग्गुने वडिलांना बागेत का नेले?

©KTBS Not to be republished

## इ. रिकाम्या जागी योग्य शब्द भर.

१. जग्गूचे वडिल थोड्या वेळाने .................. आले.

२. जग्गूने ...................... चा नाश केला.

३. कष्ट केलेले त्याला ..................... झाले.

४. झाडावर ....................... करण्यास शिक.

## ई. जोड्या जुळव.

| | | |
|---|---|---|
| आदर्श | – | फूल |
| रोप | – | झाडे जगवा |
| जास्वंदी | – | देखभाल |
| झाडे लावा | – | बाग |

## उ. खालील वाक्ये बरोबर की चूक हे वाक्यासमोरील कंसात लिही.

१. जग्गूच्या वडिलांची बाग ही आदर्श बाग म्हणून प्रसिद्ध होती. (        )

२. मुलांनी झाडांची फळे तोडली. (        )

३. जग्गूने फणसाचे रोप लावले. (        )

४. वडिलांनी जग्गूला शाबासकी दिली. (        )

## ऊ. जवळच्या बागेस भेट दे. त्याचे वर्णन तुझ्या शब्दात सांग.

## ए. तुला माहीत असलेल्या फुलांची यादी कर.

**ऐ.** १. तुझा हात तुझ्या मित्राने पिरगळला तर तुला काय होईल?

२. झाडांच्या फांद्या पिरगळून तोडल्याने झाडांना काय होईल?

©KTBS Not to be republished

**ओ. समजून लिही.**

झाड बघितल्यावर कोण कोणते शब्द मनात आठवतात?

- तुला आवडणाऱ्या फळांची यादी कर.
- झाडावर कोणा कोणाचे घरटे असते?


**औ. तुला आवडणाऱ्या फुलाचे/झाडाचे चित्र काढ.**

**अं. खालील वाक्ये मोठ्याने वाच व लिही.**

१. झाडे लावा, झाडे जगवा.

२. दारोदारी एक झाड, गावोगावी एक वन
देशाचे करु नंदनवन

©KTBS Not to be republished



पाठ - ३

# बाहुलीची शाळा




बाहुलीचे नाव आई
घालुया का शाळेत?
मीच घेऊन जाईन तिला
शाळेच्या वेळेत



आई तिला गणवेष
देशील का शिवून?
छोटसं दप्तर
देशील का घेऊन!

आई तिला पुस्तके
नको तू घेऊ
पुस्तके घेण्यासाठी
शाळेतच जाऊ.

डबा बिबा नको आई
सांगू का तुला
शाळेतच वरणभात
देईन मी तिला



**- प्रचलित गीत**

Not to be republished

नवीन शब्दांचे अर्थ –

गणवेष – ठरविलेला एकसारखा पोशाख.

दप्तर – शालोपयोगी सामान घातलेली पिशवी.

## अभ्यास

**अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.**

१. शाळेमध्ये कोणाचे नाव घालायचे आहे?


२. गणवेष कोण शिवून देणार?

३. पुस्तके घेण्यासाठी मुलगी कोठे जाऊ असे म्हणते आहे?

४. डबा नको असे तिने का म्हटले आहे?

५. शाळेच्या जेवणात कोणते पदार्थ आहेत?

**आ. दप्तरात, डब्यात, कंपासपेटीत काय काय ठेवशील ते सांग पाहू.**



**इ. चूक (×) की बरोबर (✓) ते सांग.**

©KTBS Not to be republished

१. शाळेत गणवेष घालून जावे. ☐

२. शाळेत कधीही जावे. ☐

३. वर्गात खूप दंगा करावा. ☐

४. शाळेचा अभ्यास वेळेवर पूर्ण करावा. ☐

५. गुरुजनांचा नेहमी आदर ठेवावा. ☐

**ई. खालील दिलेल्या शब्दांच्या मदतीने रिकाम्या जागा भर.**

(वर, बरोबर, मध्ये, जवळ)

१. घरा ..................... देऊळ आहे.

२. बागे ..................... गुलाबाचे झाड आहे.

३. झाडा ..................... पेरु आहे.

४. मी, आई ..................... बाजारात जाईन.

**उ. शिंपी दादा काम करताना कात्री, मशीन, सुई, कपडा या वस्तूंचा वापर करतो. तर हे लोक काम करताना कोणत्या वस्तू वापरतात?**

डॉक्टरसाहेब : ______ ______ ______ ______

सुतारदादा : ______ ______ ______ ______

लोहारदादा : ______ ______ ______ ______

शेतकरीदादा : ______ ______ ______ ______

©KTBS Not to be republished

ऊ. तुझ्याकडे असलेल्या खेळण्यांची नावे लिही.

ए. तुझ्या मित्र मैत्रिणींकडे कोणकोणती खेळणी आहेत?

ऐ. ठिपके जोडून बाहुली तयार कर आणि रंगव.



©KTBS Not to be republished

पाठ – ४


# ससलू वाट चुकला

एक ससा होता. तो सुंदर होता. त्याचे नाव होते ससलू. ससलू फार खोडकर होता. गोडगोड बोलायचा.टुणूक टुणूक उड्या मारायचा. तो आईचा फार लाडका होता. आई त्याल दररोज सांगायची, "ससलू तू अजून लहान आहेस. घराजवळच खेळ. दूर जाऊ नकोस. रानातील हिंस्त्र प्राणी लहान प्राण्यांना खाऊन टाकतात."



एकदा ससलू खेळता खेळता घरापासून दूर गेला. लुसलुशीत गवत खाता खाता दूर भटकला व वाट चुकला. घराची वाट शोधू लागला. आईची आठवण येऊन रडायला लागला. त्याला पलीकडे एक गाय दिसली. गाईजवळ येऊन ससलू म्हणाला, गाईबाई, मी वाट चुकलोय. मला घरी पोहचवाल काय? गाय म्हणाली, मी रहाते पलीकडच्या घरात. दुरवर कधी गेलेच नाही. मला माहीत नाही तुझे घर.

© NCERT not to be republished




आता ससलुचे रडणे वाढले. गाईला दया आली. रडू नको बाळ! भल्या मोठ्या वडाच्या झाडावर माकडांचा कळप राहतो. माकडे फार दूरवर हिंडतात. ती सांगतील तुझ्या घराची वाट.

ससलू वडाच्या झाडाकडे गेला. तेथे जाऊन ओक्साबोक्शी रडू लागला. त्याचे रडणे ऐकून माकडदादा खाली उतरले. ससलुने सर्व हकिकत त्याला सांगितली. माकडाचे पिल्लू अबलू ससलू जवळ आले व म्हणाले, भिऊ नकोस ससलू. माझे बाबा तुला तुझ्या घरी पोहचवतील. ससलुला फार आनंद झाला. माकडाने त्याला नाव, गाव, पत्ता विचारला. आईने त्याला सर्व शिकविले होते. ससलुने सांगितले. “माझे नाव ससलू, बबलू ससोबाचा मी मुलगा. ताडोबाच्या जंगलात ससेवाडीत आम्ही राहतो.” माकड ससेवाडीच्या दिशेने वाट काढत पुढे चालले. ससलू माकडाच्या पाठीमागून सावकाश गेला.

सर्व लहान - मोठे ससे जमा झाले. ससलूची आई फार रडत होती. ससलुला माकडदादाच्या पाठीमागे बघून तिला फार आनंद झाला. आईला बघताच ससलु आईच्या

©KTBS Not to be republished

कुशीत शिरला. ससलुच्या आई-बाबांनी माकडदादाचे आभार मानले व म्हणाले, आम्ही तुमचे उपकार कधीही विसरणार नाही. ससलुच्या आईने माकडदादाला घरातील कोबी, गाजर, पालकाची पाने, आणून दिली. आणि केंव्हातरी ससेवाडीला येत जा म्हणाली.



ससलू थकला होता. "माकडदादा उद्या मी तुमच्या अबलुबरोबर खेळायला येऊ?" ससलुने विचारले. "ये बाळ. पण, रस्ता चुकू नकोस." हे ऐकून सर्वजण हसू लागले. माकडदादा सर्वांचा निरोप घेऊन आपल्या घरी परतले.

**नवीन शब्दांचे अर्थ –**

हिंस्त्र – क्रूर

लुसलुशीत – मऊ

थकला – दमला

ओक्साबोक्सी – जोरजोरात

उपकार – दुसऱ्याला केलेली मदत

© KTBS Not to be republished

# अभ्यास

## अ. खालील प्रश्नांची उत्तरे दे.

१. सशाचे नाव काय होते?

२. ससलू का रडू लागला?

३. झाडावर कोणत्या प्राण्यांचा कळप रहात होता?

४. ससेवाडीत माकडदादाला काय खायला मिळाले?

## आ. जो खूप जोरात धावतो. त्याला आपण म्हणतो.

तो घोड्या सारखा धावतो.

आता सांगा यांना काय म्हणाल?

१. जो खूप सावकाश चालतो.

तो ................ सारखा चालतो.

२. जो खूप चांगले पोहतो.

तो ................ सारखा पोहतो.

## इ. विचार करुन सांग.

जेव्हा ससलू घराची वाट चुकला तेव्हा

- तो कोणता विचार करु लागला?
- त्यावेळी त्याने कोणाची आठवण केली?

## उ. अनेक वचन कर.

| | | | |
|---|---|---|---|
| ससा | – | गाय | – |
| माकड | – | माशी | – |
| झाड | – | म्हैस | – |

©KTBS Not to be republished

ऊ. सांग, असे कोण कोण चालते?

टुणूक् टुणूक ....................

सरपटत सरपटत ....................


टप् टप् ....................

डुलत डुलत ....................

ए. समजा जत्रेमध्ये तू आणि तुझा मित्र आईपासून चुकलात तर तू आणि तुझा मित्र काय कराल ते सांग.


ऐ. या चित्रातल्या प्राण्यांना काय म्हणतात? ते कोठे राहतात? काय खातात? घरी आई-बाबांच्याकडून समजून घे.

©KTBS Not to be republished



पाठ – ५

# गौरव



© KTBS Not to be republished


एक राजा होता. तो आपल्या प्रजेवर खूप प्रेम करायचा. त्यांची नेहमी काळजी घ्यायचा. राजा खूप खूप दयाळू व न्यायप्रिय होता.

एकदा राजा फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडला. अचानक वाटेत त्याला ठेच लागली. त्याने पाहिले तर रस्त्याच्या मधोमध मध्यम आकाराचा दगड जमिनीत रुतला होता. त्याने मनाशी विचार केला की हा दगड इथे बऱ्याच दिवसापासून पडलेला दिसतो. पण याला इथून कुणीच कसे बाजूला सारले नाही. बघू येणारा जाणारा कुणी हा दगड हटवतो का? असे म्हणून राजा एका झाडामागे लपून बसला.

थोड्याच वेळात एक शेतकरी बैलजोडी घेऊन त्याच वाटेने चालला होता. शेतकऱ्याने तो दगड पाहिला आणि बाजूला वळून तो तसाच पुढे गेला. इतक्यात एक घोडेस्वार तिथे

आला. राजाने त्याला पाहिले, तो अगदी मजेत गाणे गुणगुणत चालला होता. दगड दिसताच घोडा थांबला. घोडेस्वाराने खाली पाहिले व रागारागाने पुटपुटला. “किती तरी दिवसांपासून मी हा दगड पाहतोय पण याला कुणी हटवत का नाही? इथले लोक फारच आळशी दिसतात.” आणि असे म्हणत तो पुढे निघून गेला.

काही वेळाने एक म्हातारा डोक्यावर फळांची टोपली घेऊन तिथे आला. अचानक ठेच लागून तो खाली पडला. त्याची फळे सर्वत्र विखुरली. एक विद्यार्थी तेथूनच पाठ



शाळेला निघाला होता. त्याने धावत पळत येऊन त्या आजोबांना मदत केली. त्यांना हाताला धरुन उठविले. फळे गोळा करुन टोपलीत भरली. आजोबांनी मुलाला आशीर्वाद दिला व आजोबा निघून गेले.

त्या विद्यार्थ्या तो दगड हलविण्याचा प्रयत्न केला. पण दगड काही हलेना. एक व्यक्ती तेथे आली व त्या मुलाला तिने मदत केली दोघांनी तो दगड रस्त्याच्या बाजूला सरकवला.

© TBS Not to be republished



त्या व्यक्तीने मुलाला त्याचे नाव विचारले. पाठशाळेचे नाव विचारले. दुसऱ्या दिवशी राजा पाठशाळेत आला. सर्व गुरुजनांसमोर व विद्यार्थ्यांसमोर त्याने त्या मुलाला बक्षीस दिले. त्याने केलेल्या कामाबद्दल त्याचा गौरव केला. तेंव्हाच त्या मुलालाही कळाले की दगड हलविण्यास आपल्याला राजाने मदत केली.

**नवीन शब्दांचे अर्थ –**

प्रजा – लोक

फेरफटका – फिरणे

घोडेस्वार – घोड्यावर बसलेला

पुटपुटणे – तोंडातल्या तोंडात अस्पष्ट बोलणे.

विखुरणे – पसरणे.

©KTBS Not to be republished

# अभ्यास

**अ. खालील शब्द मोठ्याने वाच.**

प्रजा, प्रेम, न्यायप्रिय, फेरफटका, घोडेस्वार, पुटपुटणे, विखुरणे, आशीर्वाद, गौरव.

**आ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.**

१. राजाला ठेच लागल्यामुळे राजाने कोणता विचार केला?

२. राजा कोठे लपून बसला?

३. त्या रस्त्यावरुन कोण कोण निघून गेले?

४. त्या विद्यार्थ्याने आजोबांना कशा प्रकारे मदत केली?

५. दगड हलविण्यास मुलाला कोणी मदत केली?

६. राजाने त्या मुलाचा गौरव कोठे केला?

**इ. घोड्यावर बसलेल्याला घोडेस्वार असे म्हणतात. तर सांग.**

१. बैलगाडी चालविणारा – ____________________

२. मोटारगाडी चालविणारा – ____________________

३. विमान चालविणारा – ____________________

४. टांगा चालविणारा – ____________________

©KTBS Not to be republished

## ई. खालील गोष्टी पाहून तू काय करशील सांग.



सार्वजनिक नळ सुरु असून पाणी वाया जात आहे.




रस्त्यात दगड आहे.



मुले फुलाच्या झाडाची फुले व फांद्या तोडत आहेत.




मुले मैदानात कचरा टाकत आहेत.



लहान मुलगा कुत्र्याला दगड मारत आहे.



रस्त्यात लहान मुलगा घसरुन पडला.



आजोबांना रस्त्यावरुन पलीकडे जायचे आहे.



घरामध्ये आई आजारी आहे.



मैदानात पेन पडले आहे.



वर्गातील तक्ता खाली पडला आहे.

©KTBS
Not to be republished

उ. खालील चित्रे पाहून चित्रातील व्यक्ती कोण कोण आहेत. ते ओळखून नावे चौकोनात लिही.
















Not to be republished ©KTBS

ऊ. खालील वाक्ये घटना घडलेल्या क्रमाने लिही.

१. शेतकरी बैलजोडी घेऊन दगडाच्या बाजूने गेला.

२. दगड कोण हलवितो हे पाहण्यासाठी राजा झाडामागे लपून बसला.

३. घोडेस्वार सैनिक दगड पाहून तसाच निघून गेला.

४. रस्त्यावर दगड पडला होता.

## ए. शब्दांचे खेळ

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र | ख | वा | ल | दा | र |

यामध्ये खालील शब्द लपलेले आहेत ते वाच

वार, दार, खवा, दाखवा, खा.

खालील दिलेल्या अक्षरावरून तूही शब्द तयार करुन पहा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| रा | जा | रा | म | न | ग | र |

## ऐ. नमुन्या प्रमाणे लिही.

नमुना :- सरळ X वाकडे

१. बाहेर X ______________

२. पुढे X ______________

३. खाली X ______________

४. थोडे X ______________

५. उठणे X ______________

६. चांगले X ______________

## ओ. कोण कोणती कामे करतो ते सांग.

१. शेतकरी

२. डॉक्टर

३. सैनिक

४. शिंपी

५. शिक्षक

६. कुंभार

©KTBS Not to be republished

## औ. अशुद्ध शब्द शुद्ध करुन लिही.

१. व्यत्की ________________

२. गौरव ________________

३. टेपली ________________

४. फेरफटाका ________________

५. बेलजोडि ________________

६. घोडास्वार ________________

## अं. खालील अक्षरांचा योग्य क्रम जुळवून वाहनांची नावे लिही.

१. य ल क सा ____________ ४. हा ज ज ____________

२. डा गा डी घो ____________ ५. मा न वि ____________

३. टा र मो ____________ ६. डी गा ग आ ____________

## अः. एका शब्दापासून अनेक शब्द बनव.

जसे:- बैल, बैलाला, बैलांना, बैलांच्या, बैलाजवळ

१. घोडा

२. दगड

३. झाड

❀ ❀ ❀

©KTBS Not to be republished

पाठ – ६

# आपला राष्ट्रध्वज

प्राणाहुनही प्रिय असे हा,
आम्हा तिरंगी झेंडा।।
तीन रंगांचे अर्थ शोधुनी,
पाटीवरती मांडा ।।
त्याग, शौर्य आणि क्रांतीचा,
पाठ केशरी सदा घ्यायचा ।।
रंग पांढरा मध्ये झळकता,
म्हणे मनातून हवी शांतता ।।
हिरव्याची तर एकच आशा,
समृद्धीने नटवा देशा ।।
प्रगती नाही गती वाचुनी,
जाणुन घ्यावे चक्रामधुनी ।।
तीन रंगांचे अर्थ अहो हे,
पाटीवरती मांडा ।।
प्राणाहुनही प्रिय असे हा,
आम्हा तिरंगी झेंडा ।।

**– संकलित गीत**

©KTBS Not to be republished

**नवीन शब्दांचे अर्थ –**

प्रिय – आवडता
त्याग – दान
शौर्य – पराक्रम
क्रांती – उलथापालथ, फेरफार
झळकणे – चकाकणे
समृद्धी – भरभराट

## अभ्यास

**अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.**

१. प्राणाहुनही आपल्याला कोण प्रिय आहे?

२. पाटीवरती काय मांडायला सांगितले आहे?

३. केशरी रंग कोणता बोध देतो?

४. आपल्या ध्वजात पांढरा रंग कोठे आहे?

५. हिरव्या रंगाची कोणती आशा आहे?

६. चक्रामधून काय समजून घ्यायचे आहे?

**आ. तिरंगी ध्वजाचे चित्र काढ व रंगव.**

तिरंगी ध्वजाचे रंग किती? ☐

क्रमाने रंग लिही. ☐ ☐ ☐

**ई. शाळेत राष्ट्रीय सणाबरोबर कोण कोणते कार्यक्रम साजरे करतात?**

**शिक्षकांच्या सहाय्याने तक्ता तयार कर.**

| दिवस | राष्ट्रीय सण / कार्यक्रम |
|---|---|
| | |

©KTBS
Not to be republished

पाठ – ७

# आणि मिनी सुधारली



'फुगे घ्या फुगे' बाहेरुन आवाज आला. मिनीने आपल्या वडिलांच्या पाकिटातून दहा रुपये घेतले. फुगेवाल्याला दहा रुपये देऊन तिने दोन फुगे घेतले, आणि ती घरी आली.

मिनीच्या हातात फुगे पाहून तिच्या आईने विचारले, "कुठून आणलेस गं फुगे?" "अगं मी विकत आणले." मिनी म्हणाली, "पण तुझ्याकडे पैसे कुठले?" आईनं विचारलं. "बाबांच्या पाकिटातून घेतले." असं म्हणून मिनी गप्प बसली.

"मिने, पैसे घेण्यापूर्वी तू बाबांना विचारलं होतंस का?" नाही आई. मी बाबांना न विचारताच पैसे घेतले." "मिने, 'तू बाबांना विचारुन पैसे घ्यायला हवे होतेस. खरं तर कुणाचीही कुठलीही वस्तू घेताना नेहमी विचारुनच घ्यावी." आई तिला समजावत म्हणाली.

आईच्या बोलण्याचा मिनीवर फारसा परिणाम झाला नाही. एक दिवस ती शेजारच्या काकूंची छत्री घेऊन आली. छत्री शोधत, शोधत काकू मिनीच्या घरी आल्या. तेव्हा आई खूपच नाराज झाली.

©KTBS Not to be republished

एक दिवस मिनी जेव्हा शाळेतून घरी आली तेव्हा तिला आपली बाहुली दिसली नाही. तिने इकडे तिकडे खूप शोधले. पण बाहुली मिळाली नाही. ती रडू लागली. तिला रडताना पाहून आई म्हणाली "तुझी बाहुली शेजारच्या राणीने नेली आहे." "मला न विचारता तिने माझी बाहुली नेलीच कशी?" रडत रडत मिनीने विचारले.

त्यावेळी आई म्हणाली. "परवा तू बाबांच्या खिशातून पैसे घेतलेस, काकूंची छत्री आणलीस तेव्हा बाबाना आणि काकूंना विचारलं होतं का?" मग मिनीला आपली चूक कळाली. आईकडे माफी मागत ती म्हणाली, "आता पुन्हा अशी चूक करणार नाही."



हे ऐकताच आईने कपाटात लपवून ठेवलेली बाहुली बाहेर काढली आणि मिनीला दिली. खरं तर मिनी सुधारावी म्हणून आईनेच बाहुली लपवून ठेवली होती. मिनी आता सुधारली आहे. ती कुणाचीही, कुठलीही वस्तू आता विचारुनच घेत असते.

©KTBS Not to be Published

# अभ्यास

**अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.**

१. मिनीने कोठून पैसे घेतले?

२. मिनीने त्या पैशांचे काय आणले?

३. मिनीला आईने कसे समजाविले?

४. मिनी का रडू लागली?

५. मिनीची बाहुली कोणी नेली असे आईने सांगितले?

६. आईने कपाटात बाहुली का ठेवली होती?

७. दुसऱ्याची वस्तू घेताना तू काय करशील?

**आ. वाक्यात उपयोग कर.**

उदा. पैसे :- अनिल पैसे घेऊन दुकानाला गेला.

१. चूक

२. माफी

३. खरे

**इ. चूक (×) की बरोबर (✓) लिही.**

१. मिनीने आईच्या कपाटातून पैसे घेतले. ☐

२. मिनीने दहा रुपयाचे फुगे आणले. ☐


३. दुसऱ्याची वस्तू विचारूनच घ्यावी. ☐

४. मिनीची बाहुली काकूने नेली होती. ☐

५. आपण कधीही खोटे बोलू नये. ☐

©KTBS Not to be republished

ई. चित्रातील अक्षरांच्या सहाय्याने शब्द तयार करून लिही.




उ. खालील वाक्ये कोणी कोणाला म्हटली आहेत ते लिही.

| | कोणी | कोणाला |
|---|---|---|
| १. कुठून आणलेस गं फुगे? | ________ | ________ |
| २. राणीने माझी बाहुली नेलीच कशी? | ________ | ________ |
| ३. आता मी पुन्हा अशी चूक करणार नाही. | ________ | ________ |

ऊ. नमुन्याप्रमाणे खालील शब्द लिही.

नमुना :- खरे - खोटे

१. इकडे ..............

२. खाणे ..............

३. आज ..............

ए. खालील शब्द वापरुन वाक्य लिही व मोठ्याने वाच.

उदा, शोधत :- पाहुणे घर शोधत शोधत आले.

१. रडत

२. हसत

©KTBS Not to be republished

३. शेजारी

४. पुन्हा

५. भर

**ऐ. नमुन्याप्रमाणे लिही.**

आई :- आईने, आईकडून, आईजवळ

बाबा – _______ _______ _______

काकू – _______ _______ _______

मीना – _______ _______ _______

राणी – _______ _______ _______

**ओ. राजूने फुगा आणला**

**राजूने फुगे आणले.**

**वरील प्रमाणे खालील वाक्ये लिही.**

१. मयुरीने रुपया घेतला. _______________

२. राधाने बाहुली घेतली. _______________

३. रहीमने नारळ आणला. _______________



©KTBS Not to be republished

पाठ – ८

# आकाशातल्या चंद्रा

आकाशातल्या चंद्रा,मला हसायला शिकव
छान छान छान मला हसायला शिकव.





पेरुवरच्या पोपटा, मला बोलायला शिकव
गोड गोड गोड मला बोलायला शिकव.

समुद्रातल्या माशा, मला पोहायला शिकव
छान छान छान मला पोहायला शिकव.





जंगलातल्या मोरा, मला नाचायला शिकव
थुई थुई थुई मला नाचायला शिकव.

शाळेतल्या ताई, मला वाचायला शिकव
खूप खूप खूप मला वाचायला शिकव.



– संकलित गीते

©KTBS
Not to be republished

## नवीन शब्दांचे अर्थ –

आकाश – आभाळ

समुद्र – सागर

जंगल – अरण्य

## अभ्यास

### अ. खालील शब्द वाच.

छान छान, थुईथुई, खूपखूप, गोडगोड.

### आ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. चंद्र कोठे असतो?

२. पोपट काय शिकवितो?

३. पोहायला कोणाकडून शिकावे असे वाटते?

४. मोराकडून कसे नाचायला शिकावे?

५. वाचायला कोण शिकविते?

### इ. कवितेच्या ओळी पूर्ण कर.

आकाशातल्या चंद्रा ..................

छान छान ......................

पेरुवरच्या पोपटा .................

................... बोलायला शिकव.

©KTBS Not to be republished

## ई. जोड्या जुळव.

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १. चंद्र | १. समुद्र |
| २. पोपट | २. शाळा |
| ३. मासा | ३. आकाश |
| ४. मोर | ४. पेरु |
| ५. बाई | ५. जंगल |

## उ. खालील शब्द नमुन्याप्रमाणे लिही.

नमुना :-


हसणे – हसायला

बोलणे – ..................

पोहणे – ..................

नाचणे – ..................

वाचणे – ..................




©KTBS Not to be republished

पाठ – ९


# मित्रधर्म

एका तलावात एक कासव रहात होते आणि त्याच तलावाच्या काठावर असलेल्या झाडावर एक माकड रहात होते. दोघांची खूप मैत्री होती. एक दिवस ते दोघेही तलावाच्या काठावर गप्पा मारीत बसले होते. इतक्यात एक वाघ त्यांच्याकडेच येत असलेला त्यांना दिसला. आता वाघ आपल्याला खाणार, तेंव्हा काय करावं म्हणून कासव आणि माकड दोघेही जीव वाचविण्यासाठी आपापल्या घरी निघाले.



माकड वेगाने झाडावर उंच असलेल्या जागेवर जाऊन पोहोचले. पण कासवाची चाल अतिशय संथ असल्याने ते तलावात जाऊ शकले नाही आणि व्हायचे तेच झाले! वाघ कासवाजवळ पोहोचलाच. कासवाला कुठंतरी लपण्याइतकाही वेळ मिळाला नाही.

©KTBS Not to be republished



©KTBS Not to be republished

वाघाने झडप घालून कासवाला आपल्या तोंडात पकडले आणि त्याला घेऊन तो एका झाडाखाली बसला. वाघाने आपले दात कासवाच्या पाठीत खुपसण्याचा प्रयत्न केला. दात घुसत नाहीत हे पाहून त्याने आपली नखे खुपसली पण कासवाच्या पाठीवर एकही ओरखडा उठला नाही. वाघाला काय करावे कळेना.

माकड आपल्या जागेवरुन हे सर्व पहात होते. अचानक त्याला कासवाला वाचविण्याची एक युक्ती सुचली. माकड झाडावरुनच डोकावत वाघाला म्हणाले, "वाघदादा, वाघदादा, कासवाची पाठ फोडण्याचा सोपा उपाय मी तुला सांगतो. कासवाला पाण्यात फेकून दे. पाण्यामुळे त्याची पाठ मऊ बनेल आणि मग तुला मिटक्या मारत खायला मिळेल."

वाघाला माकडाचे म्हणणे पटले. चला याला पाण्यात टाकू आणि याची पाठ मऊ झाली की याला मिटक्या मारीत खाऊ, वाघाने ठरविले आणि त्याने खुशीने कासवाला पाण्यात टाकले. मग काय, कासव वेगाने तलावात खोलवर गेले.



वाघ बराच वेळ तलावाच्या काठावर कासवाची वाट पहात थांबला आणि शेवटी कंटाळून आपल्या मूर्खपणाला दोष देत निघून गेला.

माकडाने युक्तीने कासवाचा जीव वाचविला आणि आपला मित्रधर्म पाळला.

**नवीन शब्दांचे अर्थ –**

ढोली – झाडाच्या बुंध्यातील पोकळ जागा.

संथ – सावकाश

लपणे – दडून बसणे

मिटक्या मारीत खाणे – आवडीने खाणे.

## अभ्यास

**अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.**

१. मैत्री कोणाकोणाची होती?

२. कासव आणि माकड घराकडे का जाऊ लागले?

३. माकड कोठे लपले?

४. कासव तलावात का जाऊ शकले नाही?

५. कासवाला खाण्यासाठी वाघाने कोणता प्रयत्न केला?

©KTBS Not to be republished

६. माकडाने कासवाची पाठ फोडण्याचा कोणता उपाय सांगितला?

७. अचानक तुझ्यासमोर वाघ आला तर?

## आ. रिकाम्या जागा भर.

१. कासव ..................... मध्ये रहात होते.

२. ..................... ची पाठ कठीण होती.

३. ..................... ने झडप घालून कासवाला पकडले.

४. कासवाला पाण्यात फेकण्यास .................. ने सांगितले.

५. आपल्या ................. दोष देत वाघ निघून गेला.

६. वाघाने कासवाच्या पाठीत ........................ खुपसण्याचा प्रयत्न केला.

## इ. कोण कोठे रहातो?

उदा :- माकड झाडावर

१. वाघ ____________________

२. घोडा ____________________

३. चिमणी ____________________

४. मुंगी ____________________

५. गाय ____________________

६. उंदीर ____________________

७. कोंबडी ____________________

८. माणूस ____________________

९. मधमाशी ____________________

१०. पोपट ____________________

११. साप ____________________

## ई. खालील प्राण्यांच्या पिल्लाला काय म्हणतात? (शिक्षकांच्या मदतीने सांग)

१. म्हैस ____________________

२. घोडी ____________________

३. शेळी ____________________

४. सिंह ____________________

५. गाय ____________________

६. हरिण ____________________

७. हत्ती ____________________

८. मेंढी ____________________स

©KTBS Not to be republished

## उ. खालील शब्द नमुन्याप्रमाणे लिही.

नमुना :- गाय-बैल

१. माकड ______________ ५. घोडा ______________

२. वाघ ______________ ६. कुत्रा ______________

३. सिंह ______________ ७. बकरा ______________

४. बोका ______________ ८. चिमणी ______________


## ऊ. खालील जोडीतील बरोबर शब्द ओळखून लिही.


१. वाग-वाघ ४. माखड-माकड

२. मैत्री-मैतरी ५. पाण्यात-पाणयात.

३. नके-नखे

## ए. खालील अक्षरांपासून शब्द तयार कर आणि लिही.




__________ __________ __________ __________

__________ __________ __________ __________

__________ __________ __________ __________

__________ __________ __________ __________

©KTBS Not to be republished

**ऐ. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांऐवजी कंसातील विरुद्धार्थी शब्द लिहून वाक्य पुन्हा लिही.**

(मऊ, मित्रधर्म, पकडले, झाडाखाली)

१. वाघ झाडावर बसला.

२. माकडाने आपला शत्रूधर्म पाळला.


३. पाण्यामुळे कासवाची पाठ कठीण बनेल.

४. वाघाने कासवाला सोडले.

**ओ. अक्षरांची योग्य जुळणी करून शब्द तयार करून मोठ्याने वाच व लिही.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. व त ला | ________ | ४. य पा उ | ________ |
| २. वा दा घ दा | ________ | ५. क मा ड | ________ |
| ३. प्र त्न य | ________ | ६. प ल णे | ________ |

❀ ❀ ❀




©KTBS Not to be republished

पाठ – १०

# त्याचे होईल कल्याण





शिवी कोणा देऊ नये ।
कोणा संगे भांडू नये ।।१।।

अनवाणी चालू नये
चालताना धावू नये ।।२।।

दुसऱ्याचे चोरू नये
खोटे कधी बोलू नये ।।३।।

गोड फार खाऊ नये
पाहिले ते मागू नये ।।४।।

चित्ती धरी जो हे बोल
त्याचे कल्याण होईल ।।५।।





–संकलित

©KTBS
Not to be republished

**नवीन शब्दांचे अर्थ –**

संगे – बरोबर, सोबत

अनवाणी – पायात चप्पल न घातलेला

चित्त – मन

कल्याण – भले, चांगले

# अभ्यास

## अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. केंव्हा धाऊ नये?

२. कसे बोलू नये?

३. फार काय खाऊ नये?

४. कल्याण कोणाचे होईल?

## आ. चांगल्या व वाईट सवयी ओळखून लिही.

१. सर्वांच्या बरोबर भांडण करणे. ____________

२. पायात चप्पल घालून चालणे. ____________

३. नेहमी खरे बोलणे. ____________

४. खूप गोड खाणे. ____________

५. दिसेल ते न मागणे. ____________

## इ. नमुन्याप्रमाणे शब्द लिही.

नमुना :- मुळूमुळू - रडणे.

भरभर - ____________

लगबग - ____________

मटमट - ____________

पटपट - ____________

©KTBS Not to be republished

## ई. चित्रे पाहून या चांगल्या सवयी लिही.



______________ ______________ ______________

______________ ______________

## उ. नमुन्याप्रमाणे गाळलेल्या जागा भर.

नमुना :- ट --- र - टक्कर

१. न --- ल          ४. ग --- त

२. च --- ल          ५. अ --- र

३. अ --- ल          ६. छ --- र

## ऊ. नमुन्याप्रमाणे जोडाक्षरे लिहून शिक्षकांकडून तपासून घे.

नमुना :- गप्‌पा - गप्पा

सज्‌जा --------     कच्‌चा --------     पक्‌का --------


गल्‌ला --------     रट्‌टा --------     खड्‌डा --------

©KTBS Not to be republished

ए. खालील चित्रावरून कोणता संदेश मिळतो. शिक्षकांकडून समजून घे.



## चित्रकथा



©KTBS
Not to be republished

पाठ – ११

# जिद्द

3 डिसेंबर हा दिन जगभर 'अपंग दिन' म्हणून साजरा केला जातो. अपंग दिनाच्या निमित्ताने शाळेच्या पटांगणावर अपंगांचे सामने होणार होते. अपंग म्हणजे शरीराने अधू असलेले लोक. कुणी आंधळे, कुणी पांगळे, कुणी थोटे असे हे लोक. असे हे लोक खेळ तरी कोणते खेळणार, असे रमेशला वाटत होते.

रमेश आपल्या बाबांबरोबर हे सामने पहायला शाळेच्या पटांगणावर आला. पटांगणावर मोठा मंडप घातला होता. सभोवार पताका लावलेल्या होत्या. तालावर बँड वाजत होता, सामने पाहण्यासाठी लोकांनी गर्दी केली होती.



सामन्याची वेळ झाली. सगळे खेळाडू कुबड्या घेऊन मैदानात आले. सर्व खेळाडू एका रांगेत उभे राहिले. एक, दोन, तीन असे पंचानी म्हणताच कुबड्या घेतलेली मुले धावू लागली. लोक आनंदाने ओरडू लागले. "शाब्बास! शाब्बास! धावा, पळा."

©KTBS Not to be republished

धावता धावता काही मुले पडली; पण ती पुन्हा उठून धावू लागली. धावण्याची शर्यत संपली. विजयी खेळाडुंचे लोकांनी टाळ्या वाजवून कौतुक केले.



मैदानावर दोन्ही पायांनी अधू असलेली मुले तीन चाकांच्या सायकलींच्या खुर्चीवर बसून प्रारंभ रेषेवर थांबली. शर्यत सुरु झाली. खुर्च्यांवर बसलेले खेळाडू हातांनी जोरजोराने चाके फिरवू लागले. रमेशला मोठे नवल वाटले. बघता बघता शर्यत संपली. सर्वांनी टाळ्या वाजवून अभिनंदन केले.

अंध मुले क्रिकेट खेळण्यासाठी मैदानात आली. सामना सुरु झाला. बॉलींग, बॅटींग करणे तसेच चेंडू पकडणे इत्यादी सर्व काही डोळस मुलाप्रमाणे खेळाडू कामगिरी करत होते. सामना मोठा चुरशीचा झाला.

रमेश व वडील शाळेच्या एका वर्गात गेले. दोन अपंग मुले चित्रे काढण्यात दंग झाली होती. त्यांना हात नव्हते. त्यातील एकजण पायाच्या बोटात ब्रश धरुन चित्र काढत होता. तर दुसरा तोंडात ब्रश धरुन चित्र रंगवत होता. हे पाहून रमेश थक्कच झाला.

©KTBS Not to be republished



रमेशचे बाबा म्हणाले, "रमेश पाहिलेस ना हे? हे अपंग असूनही किती आनंदी आहेत. त्यांचे मन खंबीर आहे. मनात जिद्द असल्यास कठीण कामही साध्य होते. आपण मात्र धडधाकट असूनही जणू अपंगच आहोत."

**नवीन शब्दांचे अर्थ –**

कुबडी – पायाने अधू असणाऱ्या लोकांना आधार देणारी काठी. (पहिले चित्र पहा)

नवल – आश्चर्य

अभिनंदन – कौतुक

चलाख – चपळ

खंबीर – मनाची उमेद न खचणारा

धडधाकट – सशक्त

©KTBS Not to be republished

# अभ्यास

**अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.**

१. अपंग दिन केंव्हा साजरा करतात?

२. अपंग म्हणजे काय?

३. स्पर्धेची तयारी कशी केली होती?

४. पटांगणावर कोणकोणत्या स्पर्धा घेण्यात आल्या?

५. स्पर्धेत भाग घेणारे कसे होते?

६. स्पर्धेमध्ये हात नसलेली मुले कशाने चित्रे काढत होती?

७. रमेशचे बाबा रमेशला काय म्हणाले?

**आ. १. तुझा वाढदिवस असतो, त्यादिवशी घरी कशी तयारी करतात ते सांग.**

**२. तुझ्या बहिणीच्या किंवा भावाच्या वाढदिवसाच्या तयारीत तू काय काय करतोस ते लिही.**

**इ. खालील शब्द नमुन्याप्रमाणे लिही.**

नमुना :- कुबडी - कुबड्या

१. पाटी

२. वाटी




३. गोटी

४. लाठी

५. चिमणी

©KTBS Not to be republished

## ई. जोड्या जुळव

| ‘अ’ | ‘ब’ |
| --- | --- |
|  | व्हॉलीबॉल |
|  | विटीदांडू |
|  | क्रिकेट |
|  | लगोरी |
|  | सापशिडी |

## उ. नमुन्याप्रमाणे लिही.

१. जसे → पटांगण, पटांगणात, पटांगणाकडे, पटांगणाच्या.

तसे → रस्ता

२. जसे → कुबडी, कुबड्या, कुबड्याना, कुबड्यांसह

तसे → गाडी

©KTBS Not to be republished

ऊ. योग्य अक्षरावर अनुस्वार देऊन अशुद्ध शब्द शुद्ध करुन लिही.

१. अंपग ____________

२. आधंळा ____________

३. रगंविणे ____________

४. मडंप ____________

५. तोडं ____________

ए. कंसातील शब्द वापरुन समानार्थी शब्द लिही.

(कर, पांगळा, दिवस, आंधळा, फरफऱ्या)

१. दिन ____________

२. हात ____________

३. अंध ____________

४. पंगू ____________

५. पताका ____________

❀ ❀ ❀

©KTBS Not to be republished

पाठ – १२

# कोकणचा राजा



आंबा पिकतो, रस गळतो.
कोकणाचा राजा बाई झिम्मा खेळतो ।।धृ।।



निळ्या आभाळी सांज सकाळी
जगताचा राजा रवी रंग फेकतो ।।१।।



पाऊस वेळी ढगांच्या ओळी
थुई थुई पक्षी राजा मोर नाचतो ।।२।।



आंब्याच्या वनी पानी लपुनी
उंच स्वरांनी कोकीळ कुहुऽ बोलती ।।३।।



पायी पैंजण हाती टिपरी
कुंजवनी बाळराजा कृष्ण खेळतो ।।४।।

– **संकलित**

©KTBS Not to be republished

**नवीन शब्दांचे अर्थ –**

आभाळ – आकाश    सांज – संध्याकाळ    जगताचा – जगाचा

## अभ्यास

**अ. खालील शब्द मोठ्याने वाच**

झिम्मा, सांज, थुईथुई, कुहूऽ, कुंजवनी, कृष्ण.

**आ. खालील प्रश्नांची उत्तरे सांग.**

१. कोकणचा राजा कोण?

२. रंगाची उधळण केंव्हा केली जाते?

३. या कवितेत मोराला काय म्हटले आहे?

४. पक्षांचा खरा राजा कोण? शिक्षकांकडून समजून घे.

५. आंब्याच्या पानात कोण लपून बसते?



**इ. कवितेतील लयबद्ध शब्द शोधून लिही.**

नमुना :– गळतो – खेळतो.

__________ __________

__________ __________

**ई. खालील चित्रे ओळखून नावे लिही.**


__________ __________ __________ __________

©KTBS Not to be republished

उ. शिक्षकांच्या मदतीने कोकणातल्या फळांची नावे सांग व लिही.


______________ ______________ ______________

______________ ______________ ______________

ऊ. जोड्या जुळव.

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १. निळे | १. मोर |
| २. राष्ट्रीय पक्षी | २. आभाळ |
| ३. आंब्याच्या | ३. कृष्ण |
| ४. बाळराजा | ४. वनी |

ए. आंब्याचे चित्र काढून पान आणि फळ छान रंगात रंगव.



ऐ. कोण ते सांग.

१. फळांचा राजा ______________ ३. फुलांचा राजा ______________

२. प्राण्यांचा राजा ______________ ४. पक्ष्यांचा राजा ______________

©KTBS Not to be republished

पाठ – १३

# परोपकारी गरुड




फार पूर्वीचे दिवस. आजच्यासारखी पूर्वी प्रवासासाठी, दळणवळणाची साधने नव्हती. लोकांना नेहमी आपला प्रवास पायीच करावा लागे. एकदा असाच एक प्रवासी पायी प्रवास करत होता. त्याला कोणत्यातरी पक्षांचा करूण स्वर ऐकू आला. त्यानं इकडे तिकडे पाहिले. त्याला एका झुडुपात एक गरुड अडकलेला दिसला.

तो प्रवासी पुढे जाऊन त्या गरुडाला म्हणाला, “थांब मित्रा, मी तुला मदत करतो,” असं म्हणून त्या प्रवाशाने हळुवारपणे त्या काटेरी झुडुपातून गरुडाचे पंख, पाय सोडवले. अन् त्याला मोकळे केले. मोकळा होताच गरुड उंच आकाशात उडून गेला.

हळूहळू ऊन तापू लागले. अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्या. आता जराशी सावली शोधावी म्हणून तो प्रवासी जागा शोधू लागला. तेथे त्याला एक पडके घर दिसले. शेवटी उन्हाचा त्रास वाचवायचा म्हणून तो त्या घराच्या आडोशाला जाऊन बसला.

©KTBS Not to be republished


त्या प्रवाशाने डोक्यावरील पागोटं काढलं आणि शेजारी ठेवलं. प्रवासी बसला होता. त्या घराच्या कौलावरुन एक भला मोठा नागसर्प सळसळत त्या प्रवाशाच्या दिशेने येत होता. याची जराशीही चाहूल प्रवाशाला नव्हती.



थोड्याच वेळात आकाशात उडालेला गरुड परत अति वेंगाने भिरभिरत त्या प्रवाशाच्या दिशेने आला. प्रवासी आश्चर्याने त्या गरुडाकडे पहात राहिला. तो आपल्या मनातच विचार करु लागला, 'काय पक्षी आहे पहा. मी थोड्या वेळापूर्वी ज्याचे प्राण वाचविले, ज्याला काट्याकुट्यातून मोकळा केला, ज्याच्यावर उपकार केले.... तर त्या उपकाराची परतफेड हा माझ्यावरच हल्ला करतो की काय?..... वा.... छान न्याय आहे!'

तो असे मनात म्हणत असतानाच गरुडाने प्रवाशाच्या अगदी डोक्यावरच, छपरावर असलेला भला मोठा नागसर्प आपल्या दोन्ही पायांनी उचलून पायात पकडला, आणि गरुडाने पुन्हा आकाशात उंच भरारी मारली. त्याने पाहिले.

©KTBS Not to be republished



जर तो गरुड वेगाने आला नसता तर? त्या कल्पनेनेच प्रवाशाच्या अंगावर काटा आला. उंच आकाशात पायात पकडलेल्या सापासह भिरभिरणाऱ्या त्या गरुडराजाचे त्याने मनोमन आभार मानले. गरुडाने परोपकाराची फेड प्रवाशाचे प्राण वाचवून केली होती.

### नवीन शब्दांचे अर्थ –

दळणवळणाची साधने – प्रवासाची साधने

परोपकारी – दुसऱ्यांना मदत करणारा

©KTBS Not to be republished

# अभ्यास

## अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. लोकांना आपला प्रवास पायीच का करावा लागत असे?

२. तू कधी पायी प्रवास केला आहेस काय?

३. प्रवाशाने गरुडाला काय म्हटले?

४. घामाच्या धारा केंव्हा वाहू लागल्या?

५. गरुड प्रवाशाच्या दिशेने परत कसा आला?

६. गरुडाचे आभार कोणी मानले?

७. गरुड प्रवाशाच्या दिशेने का आला?

## आ. तर काय झालं असतं?

नागसर्प प्रवाशाच्या दिशेने आला असता तर!

१. त्या प्रवाशाचे काय झाले असते?

२. जवळपासच्या लोकांनी कोणती कृती केली असती?

## इ. आधी काय झालं? नंतर काय झालं? ते सांग.

१. गरुड काटेरी झुडुपात अडकलेला दिसला.

२. प्रवाशाने डोक्यावरुन पागोटं काढलं.

३. प्रवासी एका भिंतीच्या आडोशाला जाऊन बसला.

४. गरुड आकाशात उंच उडून गेला.

५. गरुडाने परोपकाराची फेड प्रवाशाचे प्राण वाचवून केली.

६. घराच्या कौलावरुन एक भला मोठा नागसर्प सळसळत येत होता.

©KTBS Not to be republished

**ई. नमुन्यात दाखविल्याप्रमाणे कर.**

नमुना :- गरुड, घार, कावळा, पोपट, चिमणी – पक्षी

१. गाय, बैल, घोडा, हत्ती – ..................

२. संत्रे, चिक्कू, आंबा, डाळिंब – ..................

३. वाटाणे, मसूर, हरभरा, चवळी – ..................

४. वांगे, टोमॅटो, भेंडी, गवार – ..................

**उ. तुझ्या घराच्या आजूबाजूला कोणकोणते पक्षी व प्राणी पाहिलेस, सर्वांची नावे आठवणीने लिही.**

प्राणी ________ ________ ________ ________ ________

पक्षी ________ ________ ________ ________ ________

**ऊ. कोणत्या सणाच्या दिवशी सापाची पूजा करतात? त्या सणाविषयी माहिती सांग.**

**ए. शब्द खेळ**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ता | ज | म | ह | ल |

या शब्दामध्ये काही शब्द लपलेले आहेत.

ताज, महल, ताल, जल.....असे.

तसे आता खाली दिलेल्या अक्षरांवरुन वेगवेगळे शब्द तयार कर व लिही.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| द | ळ | ण | व | ळ | ण |

©KTBS Not to be republished

पाठ – १४

# गाडी आली गाडी आली



गाडी आली गाडी आली चला पळा रे
गाडी थांबली गाडी थांबली धक्का मारा रे ।।धृ।।

गाडी आली कुर्गहून संत्री आणली भरून भरून
संत्री उतरून घ्या रे आणि धक्का मारा रे
गाडी चालली गाडी चालली चला पळा रे ।।१।।



गाडी आली अथणीहून द्राक्षं आणली भरून भरून
द्राक्षं उतरून घ्या रे .... गाडी चालली ....।।२।।



गाडी आली रायबागहून केळी आणली भरून भरून
केळी उतरून घ्या रे .... गाडी चालली..... ।।३।।



गाडी आली कारवारहून नारळ आणले भरून भरून
नारळ उरतरून घ्या रे ... गाडी चालली .... ।।४।।

गाडी आली बेळगावीहून कुंदा आणला भरून भरून
कुंदा उतरून घ्या रे ... गाडी चालली ...... ।।५।।

– प्रचलित गीत

©KTBS Not to be republished

**नवीन शब्दांचे अर्थ –**

धक्कामारणे – ढकलणे

कुर्ग – गावाचे नाव

## अभ्यास

**अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.**

१. पळण्यास का सांगितले आहे?

२. गाडीला केव्हा धक्का मारा असे म्हटले आहे?

३. कुर्गहून काय आणले आहे?

४. द्राक्षे कोठून आणली आहेत?

५. रायबागहून केळी कशी आणली?

६. नारळ कोठून आणले आहेत?

७. बेळगावीहून काय आणले आहे?

**आ. वर्गात हे गीत साभिनय सादर कर.**

**इ. झुक झुक ऽऽ आगीन गाडी ....... मामाच्या गावाला जाऊया. व 'गाडी आली गाडी आली' हे गीत मिळवून शिक्षकांच्या मदतीने साभिनय सादर कर.**

**ई. टोपलीमध्ये वेगवेगळी फळे घातलेले चित्र येथे दिले आहे. ते पाहून तू स्वतंत्र कागदावर चित्र काढ. ती फळे ओळखून नावे लिही.**



©KTBS Not to be republished

**उ. नारळाचे झाड व नारळ यांचे कोणकोणते उपयोग होतात. हे शिक्षक/पालकांकडून समजून घे. (नारळाच्या झाडाचे चित्र काढ.)**

**खोबरे घालून तुझी आई कोणकोणते पदार्थ करते? त्या पदार्थांची नावे लिही.**

**ऊ. तुझ्या गावात/गावाशेजारी असलेल्या प्रेक्षणीय स्थळांची, मंदिराची यादी कर.**

**ए. खाली दिलेल्या आद्याक्षरावरून गावांची नावे लिही.**

उदा. :- न – निपाणी, नंदगड, नंदगाव, नंदीहळ्ळी

१. ब

२. क

**ऐ. तुझ्या गावामध्ये ने – आण करण्यासाठी कशाचा उपयोग करतात ते सांग व लिही.**

उदा. :- जनावरांचा चारा – डोक्यावरुन, सायकलवरून

१. शेतातील धान्य –

२. विटा, दगड –

**ओ. एक नाव – चिमणी, कावळा, पोपट, कबूतर यांना पक्षी म्हणतात.**

**खाली दिलेल्या समूहाला काय म्हणतात ते लिही.**

- कोबी, भेंडी, फ्लॉवर, गवार – ____________
- केळी, संत्री, पेरु, आंबा – ____________
- बस, जीप, ट्रक, ट्रॅक्टर – ____________
- गाय, म्हैस, बैल, कुत्रा – ____________
- वाघ, सिंह, चित्ता, लांडगा – ____________
- गुलाब, कमळ, चाफा, जास्वंदी – ____________
- मुंगी, झुरळ, ढेकूण, डास – ____________

©KTBS Not to be republished

पाठ - १५

# गोड सारंगी



एक छोटेसे गाव होते. एकदा त्या गावात एक सारंगीवादक आला. तो सारंगी खूपच छान वाजवायचा. रात्री देवळाच्या पायरीवर बसून त्याने जेंव्हा सारंगी वादनाला सुरुवात केली, तेंव्हा गावातील बरेच लोक त्याचे सारंगीवादन ऐकायला जमले. सारंगीचा सुमधुर आवाज आणि सारंगीवादकाची कला पाहून गावकरी खूष झाले. "व्वा! किती गोड सारंगी आहे. अहाहा! मनाला किती आनंद मिळतो." जमलेले सर्वच लोक एकमेकांशी बोलत होते.



©KTBS Not to be republished

सारंगीवअवन नाही.

रात्री बऱ्याच उशीरा सारंगीवादकानं जेंव्हा आपल्या वादनाचा समारोप केला. तेंव्हा सर्वच लोक म्हणायला लागले की, 'महाराज आपली सारंगी खूपच गोड आहे. खूपच आनंद झाला. दोन - चार दिवस इथंच मुक्काम करा.

लोकांचे हे बोलणे ऐकून भोला विचारात पडला. 'सगळे लोक सांगतात म्हणजे सारंगी खरंच गोड असावी. पण मला तिचा स्वाद कसा येत नाही.



बरीच रात्र झाल्यामुळे अनेक लोक घरी न जाता देवळातच झोपले. सारंगीवादकही सारंगी आपल्या उशीजवळ व्यवस्थित ठेवून झोपी गेला. शेजारीच असलेल्या भोलाला चैन पडत नव्हते. सारंगी मला का गोड लागत नाही? हा प्रश्न त्याला सतावत होता. तो हळूच उठला आणि सारंगी घेऊन देवळाच्या बाहेर आला. इकडे तिकडे पाहून त्याने जिभेने सारंगी चाटली. त्याला कुठंच गोडपण जाणवला नाही. त्याला खूपच राग आला. रागाच्या भरात त्याने सारंगी रस्त्याकडेच्या झुडुपात टाकली, आणि गुपचूपपणे परत आपल्या जागेवर येऊन झोपला.

©KTBS Not to be republished

सकाळी उठल्यावर सारंगी-वादकाला जेंव्हा आपली सारंगी दिसली नाही तेंव्हा त्याला, तसेच रात्री तिथं राहिलेल्या सर्वांनाच वाईट वाटले. किती गोड सारंगी होती. कुणी नेले कुणास ठाऊक म्हणून सर्वजण हळहळू लागले. भोलाला या सर्व गोष्टीचा फार राग आला. काय गोड गोड म्हणता? मी तिची चव घेतली. अजिबात मला तर ती गोड लागली नाही. तुम्ही सगळेच खोटारडे आहात. तिथे झुडुपात पडलेय, तुमची गोड सारंगी. घ्या आणि चाटा. म्हणून भोला तिथून निघून गेला.

जमलेल्या सर्वांनाच भोलाच्या या मूर्खपणावर हसावे की रडावे ते कळेना.

### नवीन शब्दांचे अर्थ -

सारंगी - एक वाद्य

सुमधुर - अतिशय गोड

निश्चित - खात्रीदायक

झुडूप - छोटी झाडे

समारोप - शेवट

## अभ्यास

### अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. गावकरी का खूष झाले?

२. भोला कोणाजवळ जाऊन बसला?

३. गावकऱ्यानी सारंगीवादकास कोणती विनंती केली?

४. लोक देवळात का झोपले?

५. भोलाने कशाची चव घेतली?

६. भोलाने रागाने सारंगी कोठे टाकली?


©KTBS Not to be republished

आ. तुला माहीत असणाऱ्या वाद्यांची नावे लिही.

१. ________ २. ________ ३. ________ ४. ________

इ. खालील वाद्यांची चित्रे व नावे यांच्या जोड्या जुळव.

१. सतार




२. व्हायोलिन



३. ढोलकी



४. बाजापेटी



५. टाळ



ई. घर – घरोघरी या प्रमाणे खालील शब्द तयार कर.

१. गाव ________ ३. देश ________

२. दार ________ ४. क्षण ________

©KTBS Not to be republished

## उ. 'भोला' ऐवजी 'माधुरी' हे नाव घालून वाक्ये पुन्हा सुधारून लिही.

१. हा भोला आहे. ____________

२. भोला दुसरीत आहे. ____________

३. भोला सारंगीवादन ऐकत होता. ____________

४. भोलाला खूप राग आला. ____________

५. भोला विचारात पडला. ____________

## ए. रिकाम्या जागी योग्य शब्द भर आणि वाक्ये मोठ्याने वाच.

१. रात्री देवळाच्या ................ बसून त्याने सारंगी वाजवली.

२. भोलाने .................... सारंगी चाटली.

३. त्याने रागाने सारंगी .................... टाकली.

## ऐ. चूक (×) की बरोबर (✓) ते सांग.

१. सारंगीवादकाची कला पाहून गावकरी नाखूष झाले.

२. भोलने सारंगी नदीत टाकली.

❀ ❀ ❀



©KTBS Not to be republished

पाठ – १६

# चला चला रे



चला चला रे खेळूया
गंमत गाणी गाऊया
पतंग उडवू रंगित सुंदर
वारा नेई त्यांना वरवर
ढगांवरी जाऊ द्या त्यांना
मांजा भरभर सोडूया

चला चला रे खेळूया
गंमत गाणी गाऊया
आज सुट्टीचा दिवस सुखाचा
गोंधळ नाही अभ्यासाचा
गोष्टी सांगू मजेमजेच्या
भेंड्या भेंड्या लावूया





चला चला रे खेळूया
गंमत गाणी गाऊया
आपण सगळे एकच होऊ
हासू खेळू सुखात राहू
फेर धरोनी नाचूया
आनंदाने राहू या

कवी – **श्री. गोविंद केळकर**

©KTBS Not to be republished

## नवीन शब्दांचे अर्थ –

ढग – मेघ

गोंधळ – गडबड

भेंड्या – एक बैठा शब्द खेळ

फेर – गोल करून

मांजा – पतंगासाठी तयार केलेला खास दोरा

## अभ्यास

### अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. मुले कशासाठी चाललेली आहेत?

२. पतंगास वरवर कोण नेतो?

३. सुट्टीचा दिवस सुखाचा का वाटतो?

४. आपण सगळे कसे राहूया?

### आ. खालील लयबद्ध शब्द मोठ्याने म्हण.

खेळूया – गाऊया

होऊ – राहू

सुंदर – वरवर

नाचूया – राहूया

सुखाचा – अभ्यासाचा

### इ. तू सुट्टीच्या दिवशी काय काय करतोस/करतेस हे तुझ्या बोली भाषेमध्ये सांग.

### ई. पालकांच्या मदतीने एक सुंदर पतंग तयार कर.

©KTBS Not to be republished

**उ. कंसात दिलेले विरुद्धार्थी शब्द शोधून रिकाम्या जागी भर.**

(खाली, येणे, दुःख, रडणे, शांतता, कुरूप)

१. सुख X ______________ ४. हसणे X ______________

२. गोंधळ X ______________ ५. जाणे X ______________

३. वर X ______________ ६. सुंदर X ______________

**ऊ. पतंगाचा दोरा 'भरभर' सोडू असे आपण म्हणतो.**

**तर खालील गोष्टीना काय म्हणतात ते लिही.**

गिरकी घेऊ ______________ झोके घेऊ ______________

नाच करू ______________ उड्या मारू ______________

**ए. खाली दिलेल्या शब्दांच्या पुढे 'या' हे अक्षर जोडून तो शब्द पुन्हा लिही.**

नमुना :- खेळ - खेळूया

१. सोड - ______________

२. लाव - ______________

३. हास - ______________

४. नाच - ______________

५. राहा - ______________


❀ ❀ ❀

©KTBS Not to be republished

## पाठ – १७

# निरोगी शरीर

(सुधाकरची आई घरात भाजी चिरत बसली आहे. इतक्यात घाईघाईत सुधाकर येतो.)



©KTBS Not to be republished

सुधाकर :- आई, आई विनायकला खूप मोठी ढाल बक्षीस मिळाली.

आई :- हो का! कशाबद्दल रे?

सुधाकर :- विनायकचा कुस्तीत पहिला नंबर आला.

आई :- अरे, हे त्याने केलेल्या मेहनतीचे फळ आहे.

सुधाकर :- आई, मेहनत करायची म्हणजे काय करायचं?

आई :- अरे, रोज लवकर उठले पाहिजे. दात घासले पाहिजेत. दररोज व्यायाम केला पाहिजे. शरीराची स्वच्छता ठेवली पाहिजे.

सुधाकर :- आई, आणखी काय करायला पाहिजे?

आई :- रोज योग्य आहार घेतला पाहिजे. ताजे दूध, फळे, भाज्या खायला पाहिजेत. खेळांचा सराव केला पाहिजे.

सुधाकर :- आई, उद्यापासून मी असेच करीन.

आई :- हं. आणि हे बघ रस्त्यावरचे उघडे पदार्थ, गोळ्या, चॉकलेट, थंड पेये इत्यादी खायचे नाही, प्यायचे नाही. जेवताना भुकेपेक्षा दोन घास कमी खायचे. आणि शरीराला विश्रांती द्यावी. त्यामुळे शरीराला थकवा येत नाही.

सुधाकर :- आई, व्यायामाचा काय फायदा होतो?

आई :- आपण खाल्लेले अन्न पचन होते. मन प्रसन्न राहते. अभ्यासातही चांगले मन लागते. शरीर निरोगी राहते.

सुधाकर :- आई, मी आतापासूनच सुरुवात करतो.

(काही दिवसांनी अमृता, फारूख, जोसेफ, विमल, श्रीनिवास, हे सर्वजण सुधाकरच्या घरी येतात.)

जोसेफ :- काकू, काकू हे घ्या पेढे. माझ्या आईने सुधाकरसाठी दिलेत.

काकू :- कसले रे पेढे?

फारूख :- अहो काकू, आपल्या सुधाकरचा पळण्याच्या स्पर्धेत पहिला नंबर आला आहे. आणि तो चांगल्या गुणांनी पासही झाला आहे.

काकू :- हे पहा, तुम्ही सर्वांनी सुद्धा सुधाकरसारखे यश मिळविले पाहिजे.

सर्व मुले :- हो काकू, आम्ही दररोज लवकर उठणार. भरपूर व्यायाम करणार. शरीर स्वच्छ ठेवणार. अभ्यास करणार आणि यश मिळविणार.

(सर्व मुलें दररोज व्यायाम करण्याचा निश्चय करून घरी गेली.)

©KTBS Not to be republished

## नवीन शब्दांचे अर्थ –

व्यायाम – कसरत

मेहनत – कष्ट

सराव – पुन्हा पुन्हा प्रयत्न करणे

विश्रांती घेणे – आराम करणे

स्पर्धा – सामना

## अभ्यास

### अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. विनायकचा कोणत्या खेळात नंबर आला?

२. आपण दररोज केव्हा उठावे? असे आई सांगते.

३. दररोज लवकर उठून काय करावे?

४. आपण कोणता आहार घेतला पाहिजे?

५. शरीराला विश्रांती कशासाठी द्यावी?

६. स्पर्धेत नंबर मिळविण्यासाठी तू काय करशील?

७. सुधाकरच्या घरी कोण कोण आले?

८. मुलांनी कोणता निश्चय केला?

### आ. रिकाम्या जागी योग्य शब्द भर.

१. विश्रांती घेतल्यामुळे ........................ येत नाही.

२. दररोज ........................ घासले पाहिजेत.

३. आपले शरीर ...................... असले पाहिजे.

४. रस्त्यावरचे ......................... पदार्थ खाऊ नयेत.

५. सुधाकरचा ...................... स्पर्धेत पहिला नंबर आला.

६. व्यायाम केल्यामुळे अन्न......................... होते.

©KTBS Not to be republished

इ. तुझा दिनक्रम तुझ्या बोली भाषेत सांग.

ई. तुझ्या मित्र - मैत्रिणींच्या नावांची यादी कर व त्यांच्या समोर त्यांना आवडणाऱ्या खेळांची यादी कर.

नमुना :- गोपाळ - खो-खो कबड्डी

| | | |
|---|---|---|
| ____________ | ____________ | ____________ |
| ____________ | ____________ | ____________ |
| ____________ | ____________ | ____________ |
| ____________ | ____________ | ____________ |
| ____________ | ____________ | ____________ |

उ. खालील चौकटीत काही खेळांची नावे लपलेली आहेत. ती शोध व लिही.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मा | चो | र | पो | ली | स |
| वा | रा | व्हॉ | ली | बॉ | ल |
| घ | क | ब | ड्डी | प | लं |
| शे | चा | ल | गो | री | ग |
| ळी | ल | पं | डा | व | डी |
| सा | प | शि | डी | डा | मी |

____________ ____________
____________ ____________
____________ ____________
____________ ____________
____________ ____________
____________ ____________

©KTBS Not to be republished

ऊ. टोपलीत फळे व भाज्या यांचे चित्र वेगळ्या कागदावर काढ आणि रंगव.



वर दिलेल्या टोपलीतील फळे व भाज्या यांची नावे योग्य ठिकाणी लिही.

| भाज्या | फळे |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |

ए. शिजवून खायच्या भाज्या आणि कच्च्या खायच्या भाज्या यांची यादी कर –

| शिजवून खायच्या भाज्या | कच्च्या खायच्या भाज्या |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

©KTBS Not to be republished

ऐ. दुधापासून कोणकोणते पदार्थ तयार करतात याची यादी कर.

__________ __________ __________ __________

__________ __________ __________ __________

__________ __________ __________ __________

ओ. अधोरेखित शब्दाऐवजी कंसात दिलेले विरुद्धार्थी शब्द वापरून वाक्य पुन्हा लिही व वाच.

(सावकाश, कमी)

१. भुकेपेक्षा दोन घास जास्त खावेत.

२. सुधाकर घाईघाईत येतो.

औ. बरोबर (✓) की चूक (✗) ओळख.

१. आपण दररोज व्यायाम करावा. ☐

२. जोसेफने काकूला साखर दिली. ☐

३. सुधाकर चांगल्या गुणांनी पास झाला. ☐

४. आपण गोळ्या, चॉकलेट जास्त खाऊ नये. ☐

❀ ❀ ❀


©KTBS Not to be republished

पाठ – १८

# आणखी कोण?



फळे भाज्या धान्यावर जगते कोण?
मनुष्य, किटक, पक्षी, हरीण,
आणखी कोण! आणखी कोण!





डिझेलवर पळते कोण?
मोटार, ट्रॅक्टर, रेल्वे इंजिन,
आणखी कोण! आणखी कोण!





पेट्रोलवर पळते कोण?
स्कूटर, रिक्षा, कार,
आणखी कोण! आणखी कोण!





वीज, सौरशक्तीवर चालते कोण?
कॉम्प्युटर, टी.व्ही. पंखा, फोन,
आणखी कोण! आणखी कोण!







– प्रचलित कोडी

©KTBS not to be republished

## नवीन शब्दांचे अर्थ –

किटक – किडा डिझेल – पातळ इंधन पेट्रोल – पातळ इंधन

# अभ्यास

### अ. खालील शब्द वाच व लिही.

सौरशक्ती – सुर्यापासून मिळणारी शक्ती

कॉम्प्युटर – संगणक

फोन – दूरध्वनी

### आ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. फळे, भाज्या व धान्यावर कोण कोण जगते?

२. डिझेलवर काय काय पळते?

३. पेट्रोलवर कोण कोण पळते?

४. विज, सौरशक्तीवर कोण कोण चालते?

### इ. खाली दिलेल्या वाहनांची विभागणी कर.

जहाज, बोट, पाणबुडी, रॉकेट, रिक्षा, विमान, स्कूटर, मोटार, रेल्वे, कार.

| क्रमांक | जमिनीवरून धावणारी वाहने | आकाशात उडणारी वाहने | पाण्यातून चालणारी वाहने |
|---|---|---|---|
| १. | ____________ | ____________ | ____________ |
| २. | ____________ | ____________ | ____________ |
| ३. | ____________ | ____________ | ____________ |

©KTBS Not to be republished

## ई. गटात न जुळणारा शब्द लिही.

१. मुंगी, माशी, डास, हरीण

२. रॉकेट, रिक्षा, कार, स्कूटर

३. कॉम्प्युटर, टी.व्ही., रेल्वे, पंखा

४. कावळा, मनुष्य, चिमणी, पोपट

## उ. खाली दिलेल्या चौकटीत काही भाज्या, पक्षी, वाहने लपलेली आहेत.

शोधून लिही बरं!

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ब | स | प | ड | व | ळ | य | पो |
| मै | ना | का | क | डी | घा | रि | प |
| झ | चि | म | णी | स्कू | र | क्षा | ट |
| का | र | मो | वि | ट | गि | धा | ड |
| मे | थी | र | मा | र | रॉ | के | ट |
| पा | ल | क | न | आ | ग | गा | डी |

__________

__________

__________

__________

__________

__________

__________

__________

__________

❀ ❀ ❀

©KTBS
Not to be republished

पाठ – १९

# खेळ खेळूया लंगडीचा



खेळाचा तास होता. अनुताई मुलांना घेऊन मैदानावर गेल्या. मुले म्हणाली, कबड्डी खेळूया. मुली म्हणाल्या खो-खो खेळूया.

अनुताई : नको! सर्व मिळून लंगडी खेळूया.

प्रफुल्ल : हॅ! लंगडी तर मुलींचा खेळ. आमचा तो खेळ नव्हे.

अनुताई : अरे! तसे नाही. अमुक खेळ मुलांचा, अमूक खेळ मुलींचा. असे काही नसते. प्रत्येक खेळ मुले आणि मुलीही खेळू शकतात. सर्वांनी मिळून खेळले पाहिजे.

पिटर : चला तर, आपण सारे मिळून खेळू.

©KTBS Not to be republished

| | | |
|---|---|---|
| रविना | : | हो! हो चला तर. |
| लता | : | मी या छोट्या काठीने मैदान आखते. चार मुले व चार मुली एका बाजूला, दुसऱ्या बाजूला चार मुले व चार मुली. |
| शाहिद | : | ताई मी सुरुवात करतो. लंगडी मी घालणार! |

(लता आणि महेश पळू लागतात. शाहिद लंगडी घालत त्यांना पकडण्याचा प्रयत्न करतो.)

शाहिदने लताला झटक्यात बाद केले. पण महेश काही केल्या आऊट होत नव्हता. शेवटी जेंव्हा रेश्मा लंगडी घालायला गेली, तेंव्हा तिने महेशला बाद केले. पाहणारी मुले आनंदाने टाळ्या वाजवीत होती.

अनुताई : आता हा गट लंगडी घालेल आणि तुम्ही पळायचे.

रेश्मा पळू लागली. शाहिदसुद्धा पळू लागला. रवि सुरेख लंगडी घालत आला. शाहिद आऊट झाला. पण शेवटपर्यंत रेश्मा आऊट झालीच नाही. सर्वांनी टाळ्या वाजवून तिचे कौतुक केले. इतक्यात शाळा सुटल्याची शाळा घंटा झाली. अनुताईनी डाव थांबवला. सारी मुले वर्गात पळाली.

### नवीन शब्दांचे अर्थ –

आऊट होणे – बाद होणे.

## अभ्यास

### अ. खालील शब्द मोठ्याने वाच.

कबड्डी, खो-खो, लंगडी, सर्वांनी, सुरेख, टाळ्या, छोट्या, वर्गात, हॅ, हो-हो. झटक्यात, प्रयत्न.

© KTBS Not to be republished

## आ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. शिक्षिकेचे नाव काय होते?

२. त्यांनी कोणता खेळ खेळण्यास सांगितले?

३. लताने मुलामुलींचे किती गट केले?

४. लंगडी घालण्यास कोणी सुरुवात केली?

५. महेशला कोणी आऊट केले?

६. रेश्माचे सर्वांनी कौतुक का केले?

## इ. या पाठामध्ये आलेल्या मुलामुलींची नावे लिही.

_______________ _______________ _______________

_______________ _______________ _______________

_______________ _______________ _______________

©KTBS
Not to be republished

## ई. रिकाम्या जागी योग्य शब्द भर.

(रवी, झटक्यात, छोट्या काठीने, वेळ)

१. लताने .................... काठीने मैदान आखले.

२. .................... सुरेख लंगडी घालत होता.

३. शाहिदने लताला .................... बाद केले.

४. शाळा सुटल्याची .................... झाली.

## उ. खालील शब्द दिलेल्या नमुन्याप्रमाणे लिही.

नमुना :- मुलगा - मुले - मुलांना - मुलांचा

मुलगी -

ऊ. जसे आपण मुलाचा गट असे म्हणतो. त्याप्रमाणे खालील शब्दांना काय म्हणतात?

पक्ष्यांचा –

बकऱ्यांचा –

फुलांचा –

केळ्यांचा –

द्राक्षांचा –


चाव्यांचा –

धान्यांची –

ए. मुला – मुलींचे गट करून लंगडीचा खेळ घे.

❀ ❀ ❀

©KTBS Not to be republished




# चित्रांचा क्रम लावा



© KTBS Not to be republished


## चित्रकथा : मोठ्यांचे म्हणणं ऐकावं




© NCERT Not to be republished




©KTBS Not to be republished



# शब्दसंग्रह

## अ
अपंग
अभिनंदन
अंग
अजाण

## आ
आपले
आदर्श
आयुष्य
आनंद
आशीर्वाद
आकाश
आहार

## इ
इतक्यात
इकडे

## उ
उडी
उन्ह
उपकार

## ऊ
ऊन

## ए
एकमेक

## ओ
ओक्साबोक्सी
ओरखडा

## क
कौतुक
कुबडी
क्रिकेट
कुस्ती
काटेकुटे
कॉम्प्युटर
कामगिरी

## ख
खेळणे
खड्डा
खोडकर
खाणे
खेळाडू

## ग
गौरव
गर्दी
गोष्ट
गोळी
गणवेष
गुपचूप

## घ
घोडेस्वार
घेणे
घाई
घुमणे

## च
चॉकलेट
चंद्र
चुरस

## ज
जास्वंदी
जोरजोराने

## झ
झुडूप

## ट
ट्रॅक्टर

## ड
डोळस

©KTBS Not to be republished

त

तक्ता
तासन्तास

थ

थोडे
थक्क
थुईथुई
थकवा

द

दळणवळण

ध

धावणे
धडधाकट
धान्य

न

निसर्ग
निश्चय
न्यायप्रिय
निश्चित
नागसर्प
नेहमी

प

प्रसिद्ध
प्राणी
पिल्लू
प्रेम
प्रजा
प्रारंभ
पदार्थ
प्रसन्न
पूर्वी
प्रवास
प्राण
प्रफुल्ल
प्रेम
पुस्तक

फ

फांदी

ब

बैलजोडी
बँड
बॅटिंग
बॉलिंग
बजावणे

भ

भले
भेंडी

म

मग्न
माकड
मिटकी
म्हण
मूर्ख
मित्रधर्म
मुक्काम
मेहनत

य

युक्ती
योग्य

र

राजा
रागारागाने
राणी

ल

लुसलुशीत

व

वड
विद्यार्थी
व्यक्ती
वस्तू
वाचविणे
विश्वास
व्यवस्थित
व्यायाम
विश्रांती
विजयी

श

शब्द
शेतकरी
शेजारी
शाब्बास
शर्यत

स

समुद्र
संध्याकाळ
सार्थक
सुंदर
सर्वजण
सार्वजनिक
सुधारावे
संथ
स्पर्धा
सुमधुर
सूर्य

ह

हिंस्त्र
हळुवार
हल्ला
हौस




©KTBS Not to be republished